# दीर्घांक



# बुध्दिबळ आणि झब्बू

**( दीर्घांक )**

**-- चं. प्र. देशपांडे**

**दृश्य पहिले**

सुशोभित दिवाणखाना.

जगदीप  देसाई ( २६ ) आणि नयनतारा ठाकूर ( २५ ) प्रवेश करतात. कुलूप उघडून कडी काढल्याचा आवाज येतो आणि नंतर ती दोघं आत येतात.

नयनतारा: ( किल्ली अडकवून ठेवत ) ये, ये ना ! बस ! हे आमचं घर. लग्न होऊन दोनच महिने झालेत. मी सुध्दा नीट रुळायचीय अजून या घरात.

जगदीप: मस्त आहे. छान आहे. बरं झालं आपण त्या दुकानात भेटलो ते. कॉलेजातल्या ओळखीला आज उजाळा मिळाला.

नयनतारा: हो ना रे ! सगळयाच जुन्या ओळखी काळाच्या पडद्याआड गेल्या तर आपल्यालाही बरं नाही वाटत.

जगदीप: काय करतात म्हणालीस मिस्टर तुझे ?

नयनतारा: अजून कुठे काय म्हणाले मी ? मी तजेलदार झालेय, एनर्जेटिक वाटतेय हेच तर चाललं होतं तुझं ! ते सीआयडी इन्स्पेक्टर आहेत. शिवाय त्यांच्या कॉलेजात ते बॉक्सिंग चॅम्पियन होते.

जगदीप: बाप रे ।

नयनतारा: का बरं ?

जगदीप: नाही, बॉक्सिंग ऊर्फ मुष्टियुध्द म्हणजे जरा भयानकच वाटतो तो खेळ. पाहतो नं आपण टीव्हीवर. पहिले काही राऊंडस् कुणाचाच खास असा टोला बसत नाही. टेन्शनमुळं आणि तिरक्या पायांवर उड्या मारून घामाघूम होतात नुसते. मग त्यातलं एखादं खूप थकतं. त्याचा फायदा घेऊन मग दुसरं त्याला दणादण हाणून काढतं. मला तर तो दमात उखडून हाणायचा खेळ वाटतो. पण काय गं पुढं काही डेव्हलप नाही केलं वाटतं त्यांनी ? ऑलिम्पिकला वगैरे काही कुठं दिसले नाहीत ?

नयनतारा: छे रे ! असे खूप असतात बॉक्सर, सगळे थोडेच ऑलिम्पिकला जातात ?

जगदीप: स्वभाव रागीट आहे का ?

नयनतारा: छे रे ! तसं काही नाही.

जगदीप: पण काय गं, या लोकांना केस अगदी बारीक ठेवावे लागतात का ?

नयनतारा: ते नाही मला माहीत. हल्ली तसे भांगबिंग पाडण्या इतपत ठेवतात ते केस.

जगदीप: आणि नाकाचं हाड ? मी असं ऐकलं होतं की या लोकांचं नाकाचं हाड काढलेलं असतं म्हणून ? पण नुसतं कातडं कसं काय राहणार हाडाशिवाय ?

नयनतारा: ते नाही माहीत. अगदी पुढं जाणारे काढत असतील हाड वगैरे. हे काही इतके पुढं गेले नाहीत. नाकाचं हाड आहे. दातसुध्दा आहेत.

जगदीप: अच्छा ! तरीपण जरा भीतीदायक असेल त्यांचं व्यक्तिमत्व ? दरारा टाईप ?

नयनतारा: तसं काही नाही.

जगदीप: जाऊ दे ! भेट होईलच कधीतरी ! साखरेचं वर्णन करून साखर थोडीच कळते !

नयनतारा: आत्तासुध्दा थांबलास थोडा वेळ तर येतीलच ते.

जगदीप: पण काही असो, एक सांगतो मी तुला, आता बऱ्याच दिवसांनी बघितलं ना मी, बराच फरक पडलाय तुझ्यात ! म्हणजे तुझ्यासारखी एखादी नटी असेल नं तर तिला मादक सौंदर्याचा □टमबाँबच म्हणतील लोक !

नयनतारा: ए, काहीतरीच काय ? इतकी आकर्षक दिसतेय मी ?

जगदीप: माझ्या मनात तर तुला डोकावून पाहता येणार नाही ! म्हणून सांगावं लागतंय मला !

नयनतारा: म्हणजे इतका काय फरक पडलाय बाई ! ते तरी सांग.

जगदीप: आता तू जुनी मैत्रिण आहेस म्हणून सांगायला हरकत नाही पण एखाद्या स्त्रीच्या शरीराची डोळयांत भरलेली वैशिष्ट्यं सांगणं म्हणजे याला कुणी असभ्यपणाही म्हणून शकेल.

नयनतारा: असभ्यपणा कसला रे ! आणि बोलायचं टाळलं तरी वाटायचं ते वाटतच असतं नं !

जगदीप: पण असं वस्तुस्थिती समजणाऱ्या स्त्रिया कितीशा असतात ? जनरली असं गृहीत धरून चाललं जातं की सगळा सभ्यपणाच आहे. आणि मग अशा वेळी सभ्यपणाच्याच लेव्हलवर राहावं लागतं.

नयनतारा: तू असं बोलतोयस की जणू काही सभ्यपणा ही काहीतरी एक वाईट गोष्ट आहे.

जगदीप: नाही नाही, सभ्यपणा चांगलाच, पण खरेपणा त्याच्याहून चांगला एवढंच !

नयनतारा: तूही मजेशीर झालायस ! बोलण्याच्या ओघात विषय शिताफीनं टाळलास ! माझ्यात पडलेल्या फरकाचा !

जगदीप: अगं नाही ! तुझ्याशी कसली शिताफी ! छे छे ! सांगतो नं ! अच्छा ! तसं तर फार तपशील सांगावे लागतील. आणि सांगता येतीलही मला. म्हणजे अगदी केसांपासून पायांपर्यंत. पण इतकं बारकाईनं मी तुझ्यात रस घेणं तुला कसं काय वाटेल हा प्रश्नच आहे. त्यामुळं फक्त मुख्य मुख्य सांगतो. आणि या विषयातलं फक्त मुख्य मुख्य सांगतो म्हटल्यावर मी काय सांगणार आहे ते तुला कळलंही असेल.

त्यामुळं एवढंच सांगतो की स्वत:च्या स्त्रीत्वाची जाणीव आणि स्त्रीत्वाचा अभिमान आता तुझ्या डोळयांत अतिशय स्पष्ट आणि तीव्र झालेला आहे.

नयनतारा: हुशार आहेस. प्रत्येक गोष्टीकडं तुझं लक्ष असूनसुध्दा कडेकडेनं निसटून गेलास.

जगदीप: तसं तर तुझ्यासारखी स्त्री समोर असेल तर निसटून जाण्यापेक्षा सापडणं आणि न निसटता येणंच मी पसंत करीन. पण तुझे पतिदेव बॉक्सर आहेत हाच एक मुद्दा जरा ठळक वाटतोय मला. ( ती हसते. ) हसू नकोस. बॉक्सर लोकांना थोडासा मोकळेपणा कळतो की नाही, त्यांना विनोदबुध्दी किंवा थोडीफार छेडछाड, हसणं कळतं की नाही हे खरंच मला माहीत नाही. उलट तू आणि एक बॉक्सर ही जोडी कशी काय जमली असेल असाच विचार येतोय सारखा माझ्या डोक्यात.

नयनतारा: का ? बॉक्सर काय माणूस नसतो ?

जगदीप: नाही, माणूस असतो -- पण तसं तुझंही बरोबरच आहे म्हणा. कारण जनरली तुझ्यासारख्या सुंदर स्त्रिया या तगडे आणि शारीरिक ताकदवालेच नवरे करतात -- कारण त्यांना नवराही हवा असतो आणि बॉडीगार्डही हवा असतो. मनाच्या प्लेनपेक्षा शरीराच्या प्लेनवर जास्त जगणारे लोक जास्त पझेसिव्ह असतात. आणि बॉडीगार्ड तगडा आणि पझेसिव्ह असल्यावर तुझ्यासारख्या स्त्रियांना काळजीच नाही. आता मीसुध्दा तुझ्या नवऱ्याला अजून बघितलेलं नाही आणि आपली जुनी ओळख आहे म्हणून एवढं बोलतोय, नाहीतर कोण फंदात पडतंय असल्या ! पण एक प्रश्न विचारू का ?

नयनतारा: विचार नं !

जगदीप: विचार म्हणण्यापूर्वी विचार कर. कारण मी जो प्रश्न विचारणार आहे तो अत्यंत खाजगी बाबतीतला आहे. कदाचित तुला एकदम मुद्याला हात घातल्यासारखं वाटेल.

नयनतारा: असूं दे, विचार.

जगदीप: तुझी अशी परवानगी असली म्हणजे मग हरकत नाही. माझं एक असं मत आहे की मनाची तरलता असल्याशिवाय सौंदर्य त्याच्या सगळया सूक्ष्म मार्गांनी जाणवत नाही. जाणवलं नाही की त्याचा पूर्ण आस्वाद आणि आनंद देणं घेणं शक्य नाही. त्यामुळं जनरली सुंदर स्त्रियांचं आयुष्य हे ट्रॅजिक असतं असं मला वाटतं. कारण त्या ज्या प्रकारचे पती निवडतात त्यांना सौंदर्यातलं कितपत कळत असेल मला शंका आहे. त्या सुरक्षित राहतात, त्यांना मुलंबाळंही होत असतील, पण स्वत:चं सौंदर्य उपेक्षित राहिलं याची खंत बाळगूनच त्यांना जगावं लागतं. एक निव्वळ उत्सुकता म्हणून विचारतोय, तुझा काय अनुभव आहे ?

नयनतारा: आत्ताशी तर आमची सुरुवात आहे. तुझ्या प्रश्नाचं उत्तर नीट देण्याइतकी मी अनुभवी थोडीच आहे ?

जगदीप: राजकारण्यांसारखी उत्तरं देता येण्यासाठी राजकारणीच असलं पाहिजे असं काही नाही हेच खरं .

नयनतारा: यात कसलं आलंय राजकारण ? ज्याचं मला खरोखर उत्तर देता येईल असा दुसरा कुठलाही प्रश्न विचारून बघ.

जगदीप: म्हणजे एक प्रकारचा शंकासमाधानाचा कार्यक्रमच होईल हा. कोणत्या प्रकारच्या पिकाला कोणतं खत किती प्रमाणात कधी लागतं -- असलं होणार हे सगळं. पण हरकत नाही. खरोखरच दुसरी एक शंका आहे मला. विचारू का ?

नयनतारा: मजेशीरच आहेस तू. विचार नं.

जगदीप: प्रत्येक वेळी मी परवानगी का घेतोय कारण तुला असं वाटू नये की मी अधिकाधिक तुझ्या जवळ यायचा प्रयत्न करतोय म्हणून.

नयनतारा: मी तुला संभाषण-चतुर ही पदवी द्यायला तयार आहे.

जगदीप: सुंदर स्त्रीनं दिलेली पदवी ही शंकराचार्यांनी दिलेल्या पदवीपेक्षा मी मानाची समजतो. पण नुसती पदवी देऊन काय उपयोग आहे ?

नयनतारा: मग आणखी काय हवंय ?

जगदीप: ( क्षणभरानं ) नाही, सध्या नुसतं शंकासमाधान ! तर माझा पुढचा प्रश्न हा जनरल नसून फक्त तुझ्याबद्दल आहे. तुझी परवानगी गृहीत धरून मी आता मुद्याला हात घालतो. काही स्त्रियांना, अनेक स्त्रियांचा अनुभव असलेल्या पुरुषाचं आकर्षण वाटतं, काही स्त्रियांना असं वाटतं की आपल्याव्यतिरिक्त स्त्री म्हणजे काय हे त्याला माहीतही असू नये-- म्हणजे तो पूर्णपणे आपल्यातच बुडालेला असावा-- आणि स्त्रियांची तिसरी कॅटेगरी अशी असते की तो या दोनपैकी कुठल्या कॅटेगरीतला आहे हे आपल्याला माहीत असायची गरज नाही असं त्यांना वाटतं. तू यातल्या कुठल्या कॅटेगरीत येतेस ?

नयनतारा: असे असतात होय तीन प्रकार ?

जगदीप: मी काही शास्त्रज्ञ नाही. पण मला आपलं वाटतं की संभाषण पुढं न्यायला चांगलं आहे की नाही हे ?

नयनतारा: तुझा हा प्रश्न नुसता नवरा या पुरुषाबद्दल असला तर ठीक आहे. पण तसं नसलं तर हे एक मोक्याचं जाळंच आहे. उत्तर दिलं रे दिलं की पडलेच मी अलगद जाळयात ! कारण मग तो नवरा नसलेल्या पुरुषाबद्दलचाही ठरेल प्रश्न !

जगदीप: असं काही नाही. या प्रश्नाची व्याप्ती तुझ्या इच्छेवर आहे. तू काहीही मनात समज आणि उत्तर दे.

नयनतारा: सॉरी. मी धोका पत्करू इच्छित नाही. शिवाय यांची यायची वेळही होत आलीय.

जगदीप: ( काही क्षणांनी ) तू बघ. तत्त्वज्ञ, प्राध्यापक, वकील, डॉक्टर, इजिनियर, कलावंत, चार्टर्ड अकौंटंटस्, सरकारी किंवा इतर ऑफिसातले अधिकारी, इव्हन व्यापारी -- यांतलं कुणी कधी बॉक्सिंग चॅम्पियन असू शकतं का ? का नाही ? तर त्यांना मनाचं फील्ड हे शरीराच्या फील्डपेक्षा बरंच मोठं आणि सूक्ष्म ठेवायची गरज असते.

नयनतारा: बरं मग ?

जगदीप: काही नाही. बऱ्याच दिवसांनी भेटलोय आपण तर मला तुझ्या आयुष्याचं चित्र समजून घ्यायची उत्सुकता आहे इतकंच.

नयनतारा: पण हा विषय मघाशी झाला होता एकदा. मला तर असं वाटतंय की आल्या-आल्या तू यांच्याविरुध्द निवडणुकीचा अर्ज भरून उभा राहतोयस. आता फक्त तुमची दोघांची चिन्हं काय आहेत ते सांगून टाक. समज मला वाचता येत नाही.

जगदीप: कमाल करतेयस. पण हरकत नाही. समज तुझ्या नवऱ्याचं चिन्ह हत्ती आहे आणि माझं कबूतर.

नयनतारा: बॉक्सिंग न करता यांना हरवावं आणि आपण हरलोय हेही त्यांना कळू नये असा खेळ दिसतोय मला तर यात.

जगदीप: म्हणजे माझं शंकासमाधान करायच्या ऐवजी आता तूच शंका घेतेयस.

नयनतारा: तसं नाही रे. उलट मला तर आनंद झालाय तू भेटलास त्याचा. शिवाय तुझं बोलणंही ऐकायला मस्त वाटतं. तुझा आवाज आणि बोलण्याची पध्दत अशी आहे की गुंग होऊन जावं ऐकणाऱ्यानं. आणि तू डोळयांत बघून बोलतोस तेव्हा तर इतकं छान वाटतं !

जगदीप: मग हरकत नाही. तुझ्या मनात माझ्याबद्दल जी एक पूर्वीची इमेज आहे ती तशीच राहावी असं मला वाटतं. उगीच आपलं बोलण्याच्या ओघात, अनवधानानं, ती इमेज बिघडून काय उपयोग आहे ?

नयनतारा: नाही रे ! तसं काही नाही ! आणि इमेजेस कसल्या रे !

जगदीप: पण तसं काही खटकलं तर सांग लगेच. पुढं मग एक क्षणसुध्दा थांबणार नाही मी.

नयनतारा: तसं होणारच नाही पण.

जगदीप: मग ठीक आहे. ( काही क्षणांनी ) तुझ्या अंगावरची साडी मस्त दिसतीय. सॉरी. जरा चुकीचं बोललो मी. राग नाही ना आला ?

नयनतारा: का ? यात काय चुकीचं आहे ?

जगदीप: नाही, अंग आणि साडी यांचा वेगवेगळा उल्लेख केला म्हणून मला वाटलं चुकलं की काय !

नयनतारा: काहीतरीच. असं म्हणायची पध्दतच असते. पण तुझ्या मनात अशा वेगळयाच घडामोडी का होतात ते तुझं तुलाच माहीत.

जगदीप: मला खरं म्हणजे दुसरंच म्हणायचं होत -- विशेषत: हे असं गोलागोलांचं डिझाइन असलं नं की साडी नेसण्याच्या पध्दतीमुळं ते गोल कुठंही येऊ शकतात. कुठंही आले तरी ते करेक्टच वाटतं हे कसं काय ? पण तुझे तर करेक्टच आलेत म्हणा. तर हे आपोआप नकळत करेक्ट आलेत की मुद्दाम लक्षपूर्वक आणलेत ?

नयनतारा: हा मात्र जरा चावटपणा आहे तुझा.

जगदीप: तरी पण ?

नयनतारा: मला नाही माहीत .

जगदीप: घर छान आहे पण तुझं. फर्निचर, रंगसंगती मस्त आहे. तुझी असणार निवड सगळी.

नयनतारा: नाही. यांची एक बहीण इंटिरिअर डेकोरेटर आहे. तिनं सुचवलंय सगळं.

जगदीप: मग बरोबर आहे.

नयनतारा: काय बरोबर आहे ?

जगदीप: मी जो विचार केला तो ! मी काय म्हणतो नयन, तुम्ही हे पुढचं दार कायम उघडंच ठेवता का ?

नयनतारा: नाही. मी एकटी असले तर बंद असतं. माझी एखादी मैत्रिण माझ्या बरोबर असली तरी बंद असतं. आम्ही दोघं असल्यावरही बंद असतं. पण आता तू आहेस घरात इथं माझ्याबरोबर. आता जर दार बंद असलं आणि ते आले तर त्यांना सहन होणार नाही. तू म्हणतोस तसे जरा पझेसिव्ह टाईपच आहेत ते. म्हणून मी मुद्दाम उघडं ठेवलंय.

जगदीप: सरळ साधं वागताना सुध्दा किती विचार करावे लागतात माणसाला ! खरंच ।

नयनतारा: आपोआप होतं ते. विचाराचा खास असा त्रास घ्यावा नाही लागत.

जगदीप: तेच. मी मघाशी म्हणत होतो त्याचा पुढचा भाग तुला सांगायचा राहिला. मी तुझी खोडी काढतोय असं न समजता ऐक. सुंदर स्त्री ही बहुधा मनानंही सुंदर आणि तरल असते. तिच्या मनाच्या गरजा तिनं निवडलेला तगडा पती काही समजू शकत नाही. तिच्या मनाचा कोंडमारा होतोय हेही त्याला समजत नाही. मग तिला दोन फ्रंटवर खेळावं लागतं. एकतर त्याच्यामुळं आपलं रक्षण होतंय असं लीन राहणं आणि दुसरं म्हणजे आपल्या मनाच्या कोंडमाऱ्यातून मोकळं होण्याचे मार्ग शोधत राहणं. पण ती फक्त एकाच म्हणजे पहिल्याच फ्रंटवर फक्त आहे असं पतीला वाटत राहण्याची काळजी तिला घ्यावी लागते. या प्रकारात बिचारीचं सौंदर्य लौकर कोमेजण्याचा धोका असतो. कारण भयानक पझेसिव्ह पती तिनं स्वेच्छेनं निवडलेला असतो. आणि मनानं तिचं सौंदर्य फुलवण्याची, खेळवण्याची त्याला समज नसते. म्हणूनच फार सुंदर, आकर्षक स्त्रिया या जनरली जरा दुर्दैवीच असतात. ज्या गोष्टीचं रक्षण होतंय त्या गोष्टीचा संपूर्ण आविष्कार कधीतरी व्हायला हवाच नं ! नुसतंच रक्षण ! स्वत:च्या सौंदर्याचा आनंद तिचा तिला जो पुरुषाच्या माध्यमातून मिळाला पाहिजे तो तिला मिळू शकत नाही.

नयनतारा: आता मात्र तुला माझी दया येतीय की मला मार्गदर्शन करायचा तुझा प्रयत्न चाललाय याचा जरा विचारच करावा लागेल.

जगदीप: स्त्रीला मार्गदर्शन करणारा पुरुष म्हणजे एक तर वेडा असू शकतो किंवा स्त्रियांची काहीच माहिती नसलेला असू शकतो. आणि दयेचं म्हणशील तर स्त्रीनं मनात आणलं नं तर दयनीय राह्यची तिला

अजिबात गरज नसते. आपले मार्ग आपण चोखाळणं तिच्या सहजपणे हातात असतं. तिला अवघड काहीच नसतं.

नयनतारा: उगीच काहीतरी विचार भरवू नकोस माझ्या डोक्यात. खरं तर मला, आपल्या वेळी कॉलेजात असलेल्यांपैकी कोण कुठं आहे, काय करतात, कुणी तुला भेटलं होतं का, यात जास्त इंटरेस्ट आहे.

जगदीप: तुला इंटरेस्ट असलेलं काहीही बोलू. मी तुझ्या सहवासात असेपर्यंत तुला आनंद वाटत राहणं हे मला फार महत्त्वाचं वाटतं.

नयनतारा: म्हणजे तुझ्या मनात समज जे काही आहे तिथनं अजिबात लक्ष ढळू देणार नाहीस तू.

जगदीप: ( पाहतो. जवळ येतो.) कुठल्याही प्रक्रियेत हळूहळू तीव्रता निर्माण होणार असते. पण मधेच तो विषय ढिला सोडला तर मग पुन्हा सुरुवात होईलच याची खात्री नसते. म्हणून हे असं आवश्यक असतं. आपलं चित्त अविचल राहिलं म्हणजे दुसऱ्याचंही राहतं आणि प्रक्रियेत खंड पडत नाही. सुरुवात झालेली गोष्ट खंड न पडता चालू राहिली तर ती योग्य दिशेनं जातेच. त्याचा वेगळा विचार नाही करावा लागत.

नयनतारा: म्हणजे हेही तू स्त्रीच्या बाबतीतच म्हणतोयस का ?

जगदीप: याचं उत्तर महत्त्वाचं नाही. नुसती ही शंका ठेव मनात. आता माझ्या मनात काय चालवायचं याला तर तुझी परवानगी घ्यायची आवश्यकता नाही. आणि तू इतकी सुंदर आणि आकर्षक असल्यावर काही ना काही घडणारच मनात !

नयनतारा: म्हणजे मला न विचारता मनानं वाट्टेल ते खेळ करणार तू माझ्याशी !

जगदीप : खरं तर बाहेरसुध्दा परवानगी विचारणं चूकच आहे. थोडीथोडी अधांतरी सुरुवात करायची. म्हटलं तर असं म्हटलं तर तसं -- अशी. फक्त ही अशा प्रकारची सुरुवात आहे असं त्या स्त्रीला जाणवावं इतपत धाडस ठेवायचं. तिला आवडत असेल तर तीही त्या धूसरपणात सामील होते आणि धूसरपणा असला तरी ती सामील होतेय हे कळावं अशी थोडी बेफिकिरी किंवा मुद्दाम आणलेला अजाणतेपणा ठेवते. बास ! मग धूसरपणा स्पष्ट व्हायला वेळ लागत नाही ! काही काही वेळी तर सगळा स्पष्टपणासुध्दा त्या धूसरपणातच जगून होतो !

नयनतारा: या क्षेत्रातला इतका सूक्ष्म अभ्यास करायचा तर तुझ्या वकिली पेशाचा अभ्यास होतो की नाही ?

जगदीप: त्याचंसुध्दा एक तत्त्व आहे. कुठल्याही एका क्षेत्रात सूक्ष्मपणा आणि व्यासंग असलेलं मन दुसऱ्याही एखाद्या क्षेत्रात त्याच कार्यक्षमतेनं काम करू शकतं. कारण आयुष्यातल्या बारकाव्यांचं एक लॉजिक त्याला समजलेलं असतं.

नयनतारा: हे सगळं माझ्याशी बोलताना तुला अडखळायला नाही होत ? म्हणजे बोलावं की नको असं ?

| | |
|---|---|
| जगदीप: | एकतर मी हळुवारपणा सोडलेला नाही. आणि मोकळेपणानं बोललेलं तुला चालतं म्हणजेच तुला ते आवडतं हे वेगळं सांगायची गरज नाही. |
| नयनतारा: | स्त्रीचं मानसशास्त्र या विषयावर तुझा बराच अनुभव आणि चिंतन दिसतंय. तू एखादं पुस्तक का नाही लिहीत या विषयावर ? |
| जगदीप: | पुस्तक ल्याह्यचं म्हणजे त्या शास्त्राच्या प्रगतीचा ऐतिहासिक आलेख आपल्या दृष्टीपुढं पाहिजे. मला त्यात इंटरेस्ट नाही. शिवाय समजलेलं सांगण्यापेक्षा समजून घेत राहण्यातच मला जास्त इंटरेस्ट आहे. मनुष्य हा आयुष्यभर एक विद्यार्थीच असतो असं मी मानतो. |
| नयनतारा: | माझ्याबद्दल तुला काय समजलंय ? |
| जगदीप: | ' समजलंय ' असा पूर्णविराम नकोच. समजून घेत राहणं. आणि समजून घेत राहणं हे कितीही भेटींमधून चालू राहू शकतं. |
| नयनतारा: | लबाड आहेस. म्हणजे तू वारंवार भेटावंस ही माझी इच्छा तुला कळल्याचं आडमार्गानं सांगून टाकलंस ! |
| जगदीप: | दोघंही जेव्हा आडमार्ग वापरायला लागतात तेव्हा ते आडमार्ग राहातच नाहीत. अगदी ढळढळीत राजमार्ग  होतात. |
| नयनतारा: | तुझ्या मते ही जी काही तत्त्वं आहेत त्यांना तू अगदी शास्त्रीय सत्यं समजून चालतोयस. पण मनाच्या वागण्याच्या शक्यता अगणित असतात. सगळं हे असंच असतं किंवा असलं पाहिजे असं काही नाही. |
| जगदीप: | होतं नं असं कधीकधी. एखादं तत्त्व खोटं पडतंय असा अनुभव यायला लागतो. मग तत्त्व बदलून पाह्यचं. नवीन काही शिकायला मिळतंय का ते पाह्यचं. तेही जमलं नाही तर सध्या आपण हिच्या इंटरेस्टच्या कक्षेत येत नाही असं समजून व्यावहारिक नीतीमत्तेच्या लेव्हलवर राहून विषय सोडून द्यायचा. पण असं फार कमी वेळा घडतं. आपण जर स्त्रीत्वाला मनापासून तीव्रपणे महत्त्व देत असलो तर कुठलीही स्त्री जनरली अशा मनाचा अपमान करत नाही. |
| नयनतारा: | म्हणजे बहुसंख्य स्त्रिया चवचाल असतात असं तुझं म्हणणं ! |
| जगदीप: | नो, नो, नो ! बहुसंख्य स्त्रिया या स्वत:च्या स्त्रीत्वाला महत्त्व देणाऱ्या असतात. आणि चवचाल कधी म्हणायचं ? व्यावहारिक चौकटींची बंधनं त्यांनी मोडली तर ! पण तसं त्या करत नाहीत. दोनदोन, तीनतीन फ्रंटवर खेळण्याच्या बाबतीत स्त्रियांचा पटाईतपणा अगाध असतो. गुप्तपणाची खात्री असेल आणि समोरचा पुरुष योग्य वेळी संयमही पाळू शकणारा असेल तर स्त्री फार सराईतपणे वागू शकते. |
| नयनतारा: | हे जर सगळं तुझं ज्ञान प्रसृत करायचं ठरवलं तर समाज अनीतीमान होऊन जाईल. |
| जगदीप: | तसं काही होत नाही. समाज हा नेहमी नीतीमानच असतो आणि नीतीमानच राहतो ! |
| नयनतारा: | नुसता चावटपणा आहे हा ! |

जगदीप:		नाही. तसं नाही. कुठलंही लेबल न लावता अनुभवानं शिकण्याची वृत्ती ठेव. असं सूक्ष्मपणानं वागायची गरज माणसानंच काळाच्या ओघात तयार केलेली आहे. समाज नीतीमान ठेवण्यासाठीच हा सूक्ष्मपणा चालू असतो. प्रत्येक वेळी स्त्री शरीरानंच सामील झाली पाहिजे असं काही नसतं. नुसते मनांचे सहवासही उत्सव होऊ शकतात.

नयनतारा:	पण हे सगळं मला सांगायचं कारण ?

जगदीप:		कारण विचारण्यापेक्षा ऐकावंसं वाटतंय की नाही ते सांग.

नयनतारा:	हे पेचात पकडणं झालं मग.

जगदीप:		एकदा मोकळेपणा ठेवायचा म्हटलं की पेचात पकडणंही आलंच नं त्यात.

नयनतारा:	तू तुझा मुद्दा सोडणार नाहीस. विषयाची गोडी निर्माण केलीस पण तू माझ्यात. तरी एक गोष्ट माझ्या लक्षात आलीय. स्त्री ही एक उपभोग्य वस्तू समजतोस तू.

जगदीप:		अर्थात् ! आणि स्त्रीलाही ज्या ज्या गोष्टीचं सुख, आनंद वाटतो ती ती गोष्ट तिच्या बाबतीत उपभोग्यच असते. ज्या ज्या गोष्टींचं सातत्य आपल्याला आवडतं ते ते सगळं उपभोग्यच असतं. उदाहरणार्थ आपलं आयुष्य ! उपभोग्यच ! आपलं स्वत:चं सातत्य टिकवण्यासाठी आपली धडपड असते. म्हणजे आपण स्वत:ही स्वत:ला उपभोग्यच ! एखाद्या गोष्टीचं आपल्याला सुखं होतं, तिचं सातत्य आवडतं पण ती गोष्ट उपभोग्य नाही असं एखादं उदाहरण दे तू !

नयनतारा:	तू सगळ्या गोष्टींना अनपेक्षित कलाटणी देतोस. मजा येते.

जगदीप:		नुसता सहवास जरी म्हटला तरी, सुख वाटलं नाही तर प्रश्नच येत नाही; पण सुख वाटलं तर उपभोग्यपणा आलाच. एका वेगळ्या प्रकारे तो मित्रा-मित्रात किंवा मैत्रिणी-मैत्रिणीतही असू शकतो. पण, मित्र आणि मैत्रिण, किंवा स्त्री आणि पुरुष असं म्हटलं की हा एक पदर त्याला येणारच - नाकबूल केलं तरी.

नयनतारा:	हा विषय तर एकूण फारच गहन दिसतोय. शिवाय तुझी तपस्याही दांडगी दिसतेय याच्यात. पण मी म्हणते यात असं असून असून किती ज्ञान असणार आहे ?

जगदीप:		तू जेवढा सूक्ष्मपणा दाखवशील आणि या गहन विषयात उत्सुकता दाखवशील तेवढं यात अधिकाधिक खोल जाता येतं हे दाखवून देऊ शकेन मी तुला. गाण्यांना संगीतकार चाली देतात. आपल्याला वाटतं आता चाली संपून जातील. असून असून किती शक्यता असणार आहेत चालींच्या ? पण नवीनवी गाणी निर्माण होतच राहतात. प्रत्येक गाण्याला नवी चाल असू शकते.

नयनतारा:	तुझी चाल वाकडी वाटतेय पण मला जरा.

जगदीप:		वाकड्या वळणानं जाणारी वळणदार चाल तर जास्त खुबीदार असते. पण तुला खटकत असेल तर सांग. मी आपला जातो.

नयनतारा: थांब रे ! जाशील !

जगदीप: पण एक लक्षात घे. मी जेवढा पुढाकार घेतोय तेवढा तुझा नाहीय अजून. तू सुरक्षितच राहतेयस. माझा मोकळेपणा तुला चालतोय हे एक ठीक -- पण तुझ्या बाजूनं कुठाय मोकळेपणा ?

नयनतारा: म्हणजे काय ?

जगदीप: हे शास्त्र स्त्रियांना उपजत माहीत असतं. सगळं कळतंय तुला.

नयनतारा: तुला असं स्त्रियांना सिड्यूस करणं अनैतिक नाही वाटत ?

जगदीप: समाजाला अनैतिक वाटतं म्हणजे मलाही वाटणं भागच आहे.

नयनतारा: किती झाल्या असतील आत्तापर्यंत ?

जगदीप: तुला धरून सांगू की तुला सोडून ?

नयनतारा: मलाही धरण्याइतपत झालीय प्रगती ?

जगदीप: हा संवाद आपल्यात होऊ शकतोय म्हणजे बघ.

नयनतारा: काय बाई तरी ! किती दिवसांनी भेटलोय आपण ! आणि कुठल्या विषयावर बोलत बसलोय !

जगदीप: तुझ्या कपाळावर उजव्या बाजूला जो तीळ आहे नं तो उत्कृष्ट बुध्दिमत्तेचं लक्षण आहे.

नयनतारा: म्हणजे हाही अभ्यास आहे तुझा ?

जगदीप: हो. या तुझ्या बुध्दिमत्तेतून जे भाग्य उदयाला येणार आहे त्याचे तपशील कळायला शरीरावर इतरत्र कुठंकुठं तीळ आहेत ते पाहावं लागेल.

नयनतारा: मी सांगितलं तर चालेल का ?

जगदीप: नाही. तसं नसतं ते. प्रत्येक तिळाचा आकार, रंग या सगळया गोष्टींना अर्थ असतो.

नयनातारा: तुला दाखवायला काहीच हरकत नाही रे ! पण आता यांची यायची वेळ झालीय ! त्यांना वाटायचं की तुझा दुसराच काहीतरी उद्देश आहे.

जगदीप: ठीक आहे. पुन्हा कधीतरी. आपल्या जुन्या ओळखीला उजाळा मिळालाच आहे ; आता यातून मैत्री, स्नेह, सुख आपोआप येईल.

नयनतारा: इतकं मस्त वाटलं पण. अरे असं मनमोकळेपणानं बोलणारं कुणी भेटतच नाही.

जगदीप: माझ्यासारखे असतात लोक पण त्यांचे ब्रेक्स फार टाईट असतात. अपघाताला फार घाबरतात ते. एखादवेळी होऊही शकतो अपघात, पण अपघातच होईल असं गृहीत धरून वागू नये असं मला वाटतं -- आपण काहीतरी धोका पत्करतोय अशीसुध्दा भावना असायचं कारण नाही. आता समज आपल्यात आपुलकी वाढू शकते, जवळीक वाढू शकते - हे सगळं, मी जर आधीच करकचून ब्रेक लावून ठेवला असता तर कसं कळालं असतं ? ( तिच्या खांद्यावर हात ठेवून ) तुला सांगतो, तुझ्या डोळयांतल्या तीव्र स्त्रीत्वानं मला अगदी घट्ट पकडून ठेवलं आहे. हा नजरेच्या स्पर्शाचा परिणाम. पण प्रत्यक्ष स्पर्श असतो

त्याचेसुध्दा इतके हजारो प्रकार आहेत की काही विचारू नकोस ! एखाद्या ख्याल गायकीसारखं सुचत जातं एकेक. मैफल द्रुत लयीत कधी गेली ते कळतही नाही.

नयनतारा: ( बाजूला होत ) काहीतरीच काय ! आत्ता नको ! वेळकाळ काही आहे की नाही !

जगदीप: मस्त ! दुरावा नाहीसा होत जाणं, व्यावहारिक सभ्यतेचे पडदे गळून पडणं हेही अतिशय सुखदायक असतं.

नयनतारा: तुला भीती नाही वाटत ?

जगदीप: संगनमतानं जे होतं त्यात पूर्ण निर्भयपणा ठेवायला काही हरकत नसते. एकाची जरी चलबिचल असली किंवा विश्वासाला धक्का लावण्याची शक्यता वाटत असली तरी मग त्या फंदात न पडणं बरं ! दोघांनीही एकमेकांची काळजी घेतली पाहिजे ! काळजी म्हणजे इतकी घेतली पाहिजे की अनुकूल क्षण येईपर्यंत धीरानं वाट पाहता आली पाहिजे. एखाद्वेळेस अनुकूल क्षण कधीच येणार नाही. पण अनुकूल क्षणाव्यतिरक्त कधीही काहीही घडता कामा नये. कारण यात संपूर्ण आयुष्य उद्ध्वस्त होण्याचा धोका असतो. याबाबतीत समोरच्या व्यक्तीची पूर्ण काळजी घेणं हे पाहिलं उद्दिष्ट आणि जमेल ते जमवणं हे दुसरं उद्दिष्ट असंच फक्त असू शकतं. अर्थात् या सगळयात तरीही एक किमान धोका पत्करावा लागतोच. तेवढा मात्र पत्करला पाहिजे.

नयनतारा: माझं जर विद्यापीठ असतं ना तर डॉक्टरेट दिली असती मी तुला. या विषयावरची भगवद्गीताच आहे तुझ्याकडे.

जगदीप: मला समाधान आहे - तू असं म्हणालीस याच्यातच.

नयनतारा: पण एखादी स्त्री अनुकूल आहे की नाही हे तुला कसं कळतं ?

जगदीप: खरं म्हणजे हे सगळं उघडपणे बोलायचं नसतं. ते होऊ द्यायचं असतं आणि समजायचं असतं. पण हरकत नाही -- ज्ञानामुळं अधिकाधिक सूक्ष्मपणा येतो. सगळया पध्दती अधिकाधिक गुंतागुंतीच्या आणि सुंदर होत जातात. असं होत जाणं यालाच संस्कृती म्हणतात. त्यामुळं बोलायलाही हरकत नाही. मुख्य म्हणजे स्त्री अशा वेळी ॲट्रॅक्टिव्ह दिसायचा प्रयत्न करते. चाणाक्ष नजरेला सगळं कळतं. जाणकार नजरेचा माणूस ते आपल्याला कळल्याचं स्पष्ट दाखवतो. उदाहरणार्थ केसांची बट मागे सारत राहणे, पदर सावरत राहणे, स्वत:च्याच अंगावरून हात फिरवत राहणे, अनवधानानं, समोरचा पुरुष कसं बघतोय तिकडं आपलं लक्ष नाही असं दाखवणे आणि नकळत त्याला तसं बघू देणे, अनवधानानं स्पर्श होऊ देणे, जरा वेळ पदर बाजूला झाला तरी न सावरणे आणि बघू देणे, जाणीवपूर्वक केस वा वेणी पुढे घेणे, केस मागे बांधण्यासाठी किंवा विंचरताना दोन्ही हात उंच मागे घेऊन समोर येणे आणि एकूण फिगर पाहू देणे वगैरे पुष्कळ प्रकार असतात. न बोलता नुसतं समजून घेत राहणं फार मस्त असतं.

नयनतारा: असले प्रकार घडले तरी प्रत्येक वेळी स्त्रीचा असाच उद्देश असतो असं काही नाही.

जगदीप: निसर्गत:च आकर्षकपणा ठेवण्याकडे स्त्रीचा कल असतो. आणि उद्देश असेलही आणि नसेलही - हीच तर यातली मजा असते. समजणारा समजतो. आणि समजणारा समजतोय की नाही इकडे स्त्रीचं लक्ष असतं. तसं लक्ष असल्याचं लक्षात आलं की बेधडक तिच्याकडे पाहायला हरकत नसते. पण अर्थात् या खेळातली बेसिक काळजी घेऊन !

नयनतारा: मग अशा प्रकारचं मी कायकाय केलं आत्तापर्यंत ? मला खरंच माहीत नाही.

जगदीप: तुला माहीत नाही असंच मीही समजून चालायला तयार असल्यावर काय प्रश्न येतोय ?

नयनतारा: फार हुशार आहेस तू. सूक्ष्म तंतूंनी वळसे घालून ठेवल्यासारखं वाटतं. तू असं करतोयस हे त्यावेळी कळतही नाही. आणि कळतं तेव्हा आपल्यालाच ते आवडायला लागलेलं असतं.

जगदीप: आता बघ हं, माझा आणि तुझा पाय असे समोरासमोर आहेत. माझा जरा अर्थातच काळसर दिसतोय तुझ्यापुढे. पण नुसतं बघून सांग की माझ्या पायाची लांबी तुझ्या पायापेक्षा किती जास्त असेल ?

नयनतारा: एक्झॅक्टली नाही सांगता येणार. अंदाजे सांगीन.

जगदीप: बरं, आपण पाय जवळजवळ लावून ठेवू -- ( तसं करून ) आता ?

नयनतारा: तुझा पाय जरा पुढे घे -- बरोब्बर माझ्या अंगठ्याच्या टोकापासून ठेव -- हं -- आता बरोबर आहे --

जगदीप: सांग.

नयनतारा: आधी तू सांग.

जगदीप: नाही, आधी तू !

नयनतारा: बरं बाई - थांब हं -- नीट बघू तर दे -- ( चटकन उठून लांब जात ) नको बाबा, उत्तर भलतंच येईल याचं --

जगदीप: आत्ता नको हे बरोबर आहे तुझं. पण योग्य वेळी जर हे भलतंच उत्तर निघालं तर ते भलतंच न वाटता सर्वात समाधानकारक उत्तर वाटेल.

नयनतारा: एका भेटीतच केवढा पल्ला झाला असं वाटतं !

जगदीप: कारण तुझी समज फास्ट आहे.

नयनतारा: ए, पण सगळे तीळ दाखवणार आहे मी एकदा तुला -- मग मात्र त्यांचे अर्थ सांगावे लागतील तुला.

जगदीप: का नाही !

नयनतारा: नुसतं बोलूनसुध्दा -- थकवा येतो नाही !

जगदीप: तुझ्या विश्रांतीच्या वेळी नेहमी माझा विचार कर.

नयनतारा: तू कुणाकुणाचा करतोस विचार ?

जगदीप: एका वेळी एकच, आणि आता तर फक्त तुझाच.

नयनतारा: पण एक लक्षात ठेव, मला तुझ्याबद्दल आपुलकी वाटतेय याचा अर्थ माझ्या नवऱ्याबद्दल ती कमी झालीय असं नाही.

जगदीप: तसं होऊही नये ! तरच तो निश्चिंत राहू शकेल ! बॉक्सर तर विशेषत: निश्चिंतच राहिला पाहिजे. नाहीतर फार विध्वंस होऊ शकेल.

नयनतारा: बायको कशी आहे तुझी ?

जगदीप: छान आहे --

नयनतारा: तिला भेटायचंय एकदा. ओळख होईल.

जगदीप: मी जशी तुझी काळजी घेतोय तशी तुलाही माझी काळजी घ्यायचीय हे लक्षात ठेव.

नयनतारा: ती तुला फसवत असेल असं तुला कधी वाटत नाही ?

जगदीप: वाटतं नं ! अगदी शक्य आहे ! पण अशी मला शंकासुध्दा येऊ नये असं आत्तापर्यंत तरी वातावरण आहे.

नयनतारा: समजा ती तुला फसवतेय असं कळलं तर ?

जगदीप: नाशच होईल ! खेळाचे नियम कुणीच मोडायचे नसतात !

नयनतारा: म्हणजे तुझं कौशल्य मला जितकं माहीत आहे तितकं तिला बिचारीला काहीच माहीत नसेल !

जगदीप: कोण बिचारं आहे ते कसं कळणार !

नयनतारा: तू एका मैदानावर हुतुतू खेळत असतोस आणि त्याच वेळी दुसऱ्या मैदानावर क्रिकेट खेळत असतोस.

जगदीप: नाही. एका मैदानावर झब्बू आणि दुसऱ्या मैदानावर बुध्दिबळ ! तिचं जरा वेगळंच आहे सगळं ! अजून मला प्रॉब्लेमच वाटतो सगळा ! ही नीतीमत्ता म्हणायची की ट्रिक म्हणायची की भोळेपणा म्हणायचा ते मला अजून कळलेलं नाही. पण एकूणात बायका असतातच हुशार.

नयनतारा: म्हणजे तुझं काही वाईट मत नाही तिच्याबद्दल ! म्हणजे चांगलंच ना !

जगदीप: नाही, म्हणजे चांगलं असं नाही. या एकूण प्रकारातल्या एका वेगळयाच टोकावर जाऊन ती उभी असते सतत. तिला कुठल्याच विचारानं पकडता येत नाही.

नयनतारा: विचारानं काय पकडायचं ! संसार चांगला करायचा म्हणजे झालं !

जगदीप: ए, हा नको विषय ! आपलं चाललंय तेच चालू दे ! ( बाहेर मोटर सायकलचा आवाज येतो. )

नयनतारा: हं, आता सगळंच बास ! तुझ्या धंद्यातलं काहीतरी सांग ! हे आले !

जगदीप: मी घरबांधणीसंबंधीच्या सगळया केसेस घेतो. जमिनीचे कायदे, घरबांधणीचे कायदे, भाडेकरू कायदे, कोऑपरेटिव्ह सोसायटीचे कायदे यांत माझं स्पेशलायझेशन आहे. तसं सगळं सेट असतं. अशा केसेस आपोआप येतात. शिवाय एक जाहिरात फर्म आहे माझी.( ठाकूर - २८ - येतात ) हे आणि वकिली यावर मस्त चालतं माझं.( ठाकूरांकडे लक्ष जाते. )

नयनतारा: हे माझे मिस्टर - रमेश ठाकूर.

जगदीप: नमस्कार.

नयनतारा: हा माझा कॉलेजातला मित्र जगदीप देसाई.

ठाकूर: नमस्कार.

नयनतारा: एका दुकानात अचानक भेट झाली आमची. म्हटलं घरी चल. तुमचीही ओळख होईल.( उठते.) मी चहा करते हं. ( जाते. )

ठाकूर: ( बसत ) तुम्हाला इथं येऊन किमान एक तासभर तरी होऊन गेलेला आहे हे मी सांगू शकतो.

जगदीप: ते कसं काय ?

ठाकूर: ही कुठं आहे, ती कुठं आहे, हा काय करतो, तो काय करतो इत्यादी जर तुमची बोलणी झालेली नसती आणि तुम्ही नुकतेच आलेले असता तर हे सगळं बोलून झाल्याशिवाय ती चहा करायला गेली नसती.

जगदीप: तुम्ही खरे हाडाचे सीआयडी आहात.

ठाकूर: आणि आता चहा आणल्यावर जर का तिनं ही कुठं आहे आणि तो कुठं आहे वगैरे चालू केलं तर याचा अर्थ तुमचं दुसऱ्याच  कुठल्यातरी विषयावर इतका वेळ बोलणं झालेलं आहे.

जगदीप: म्हणजे कुठल्या विषयावर ?

ठाकूर: ( हसून ) एकमेकांची चौकशी, विचारपूस करत बसला असाल.

जगदीप: म्हणजे तुम्ही हजर नसताना एखाद्या ठिकाणी काय झालं असेल याचे बरेचसे अंदाज करू शकता तुम्ही !

ठाकूर: ऑफ-कोर्स ! तुम्हाला वाटत असेल की आमचं पोलिसी डोकं आहे आणि शिवाय बॉक्सिंगची आवड -- हिनं सांगितलंच असेल ! पण डिपार्टमेंटमधे थोडक्या काळात आपलं नाव आहे. असो. तुम्ही काय करता ?

जगदीप: मी वकील आहे आणि शिवाय माझी एक जाहिरात फर्म आहे.

ठाकूर: कसल्या जाहिराती करता ? लोणची, मसाले, पापड की टूथपेस्ट, टीव्ही, वॉशिंग मशीन ?

जगदीप: निरनिराळया. येतील त्या.

ठाकूर: एक सांगू का ?

जगदीप: सांगा नं.

ठाकूर: तुमच्या चेहऱ्यावर जो साळसूदपणा आहे नं तसा क्वचित् बघायला मिळतो. यू मस्ट बी ए व्हेरी ट्रिकी पर्सन. आणि असा बनेलपणा तुमच्या वकिली पेशाला आवश्यकच आहे म्हणा.

जगदीप: ( स्मित करून ) ही मी स्तुती समजायची की निंदा समजायची ?

ठाकूर: नाही. फक्त वस्तुस्थितीचं  वर्णन समजायचं.

( नयनतारा चहाचा ट्रे घेऊन येते )

नयनतारा: ए, आपल्यावेळचे कॉलेजातले कोणकोण भेटतात, काय करतात - काहीच सांगितलं नाहीस अजून तू मला. स्वप्ना सप्रे, पाटील, माणिक, तुम्ही ज्याला सहस्त्रबुध्दू म्हणायचा तो सहस्त्रबुध्दे --

जगदीप: ( ठाकूर सस्मित आपल्याकडे बघताहेत हे पाहून ) आता आमच्या बोलण्याचा विषयच ओळखून टाका एकदम म्हणजे झालं !

नयनतारा: म्हणजे काय ?

जगदीप: मला इथं येऊन किमान एक तास होऊन गेला असेल हे आधीच ओळखलं होतं यांनी !

नयनतारा: चल् ! तू काय गुन्हेगार म्हणून आलायस का इथं ?

ठाकूर: मी हातानं वीट फोडू शकतो आणि विचारानं काळ भेदू शकतो.

जगदीप: म्हणजे भेदिले सूर्यमंडळा ! ( हसतो. )

ठाकूर: दासबोधातलं आहे ना हे ?

जगदीप: मारुतीस्तोत्रातलं आहे. जाहिरातीसाठी आम्हाला अशी निरनिराळी माहिती ठेवावी लागते.

ठाकूर: म्हणजे लिहिलं कशासाठी आणि त्याचा उपयोग काय चाललाय !

जगदीप: ( रिलॅक्स होत ) तसे आपण काळाचे गुलाम असतो.

ठाकूर: तीळ आणि त्यांचे अर्थ या विषयाचा तुमचा थोडाफार अभ्यास असावा असं मला वाटतं --

जगदीप: कशावरून ?

ठाकूर: बोलताबोलता माझ्या उजव्या तर्जनीवरच्या तिळाकडे तुम्ही निरखून पाहिलंत !

जगदीप: तुम्ही म्हणजे कॉम्प्युटरच आहात. क्षणाक्षणाला काही ना काही टिपत जाता तुम्ही !

ठाकूर: शिवाय ! स्त्रियांच्या बाबतीत तुम्ही जरा --

जगदीप: म्हणजे ?

नयनतारा: ए, काय हे ?

ठाकूर: डिस्टर्ब होऊ नका. तुमच्या शुक्र उंचवट्यावर जाळी आहे. मी माझ्या कामाला उपयोगी पडेल म्हणून मधूनमधून हस्तरेषांचा अभ्यास केला होता. तुमचं तुमच्या बायकोशी पटत असण्याची शक्यता फार कमी आहे. कारण ज्याला स्वत:च्या वागण्याबद्दल गुप्तता ठेवावी लागते तो संशयी आणि सावध असतो.

नयनतारा: ए, उगीचच काय ?

जगदीप: म्हणजे भविष्य बिविष्य सांगता का काय ?

ठाकूर: नाही ! वर्तमान ! ( काही क्षण गप्प.)

नयनतारा: का गप्पसे झालात !

ठाकूर: नाही, मी मघाशी सहज जेव्हा ओळखलं की यांचा तिळांचा अभ्यास असावा तेव्हा यांच्या डोळयांत थोडं गिल्ट दिसलं मला आणि त्यांनी लगेच तो अपराधी भाव झटकून टाकला. तर याचं कारण काय असावं याचा विचार करत होतो. बहुतेक तुमच्या बोलण्यात हा विषय येऊन गेला असावा किंवा तुझ्या कपाळावरचा उजव्या बाजूचा तीळ पाहून यांनी मनात काहीतरी विचार केला असावा.

जगदीप: म्हणजे हळूहळू मला वाटतं माझ्या जन्माच्या वेळी माझ्या वडिलांची आर्थिक परिस्थिती कशी होती हेही सांगू शकाल तुम्ही !

ठाकूर: वाईट होती । जे पहिल्यापासून चांगल्या वैभवसंपन्न कुटुंबात वाढलेत त्यांच्या तोंडी जन्माच्या वेळची आर्थिक परिस्थिती असा विषयच यायचं कारण नाही.

नयनतारा: जाऊ दे ! उगीच त्याला नर्व्हस करू नका. त्याला काय करायचंय असली सीआयडीगिरी शिकून !

ठाकूर: ऑलराईट ! बी इन्फॉर्मल ! दुसऱ्या काही गप्पा मारू आपण !

जगदीप: हे अवघड आहे पण ! आम्ही आपलं नॅचरली काही बोलत, वागत राह्यचं आणि यांनी ते टिपून दुसरंच काहीतरी ओळखत राह्यचं !

ठाकूर: अहो, पण ज्याला काही लपवायचं आहे त्याला ही काळजी ! तुमचा काय प्रश्न आहे !

जगदीप: तरीसुध्दा आपल्या अंतरंगापर्यंत पोचायचा प्रयत्न करणारा मनुष्य समोर असणं म्हणजे डिस्टर्बच होतो माणूस !

ठाकूर: हे कबूल आहे मला. या माझ्या सवयीमुळं माझ्या सहवासात बरेचजण डिस्टर्ब होतात. प्रत्येकाला काही ना काही सवय असते ना, तशी कारणमीमांसाच येते हो माझ्या डोळयांपुढे ! बरं, जाऊं दे ! ते कोण काय करतं,कुठं असतं ते सांगायचं राहिलंय तुमचं, ते सांगा हिला, तोपर्यंत मी जरा फ्रेश होऊन येतो.(जातात.)

जगदीप: काय माणूस आहे ! ते आत गेले तरी आपल्यावर टेलिस्कोप बसवून गेलेत असं वाटतं !

नयनतारा: तसं काही नाही रे ! ( कपबशा उचलून आत जात ) आलेच हं ! ( जाते. जगदीप अत्यंत अस्वस्थ बसून. किती वाजले ते पाहतो. ते गेले त्या दिशेकडे पाहतो. मग उठतो. पुन्हा बसतो. पुन्हा हातावरच्या घड्याळात पाहतो. पुन्हा ठाकूर गेलेल्या दिशेकडे पाहतो. काही क्षणांनी ठाकूर फ्रेश झालेले येतात - हातात शिलगावलेली सिगरेट. )

ठाकूर: अरे ! तुम्ही काही बोललातच नाहीत वाटतं ! ही कुठं गेली ! ?

जगदीप: ती कपबशा घेऊन गेली आत.

ठाकूर: याचा अर्थ काय असावा बरं ? ( विचार करत राहतात. )

जगदीप: अवघड आहे ! असह्य आहे हे ! नॉर्मल लाईफ असं असूच शकणार नाही तुमच्या अवतीभंवती !

ठाकूर: नॉर्मल लाईफचं पाहू नंतर. पण एक माहिती सांगतो तुम्हाला. माझं न् हिचं लग्न फार झटपट झालं.

का माहितीय ? आमच्या चुकीमुळं लग्नाच्या आधीच हिला दिवस गेले म्हणून ! पर्सनल असलं तरी तुम्ही काही परके नाही म्हणून सांगतोय ! हिच्याशी लग्न करून हिला बायको म्हणून सांभाळणं कठीण आहे हे मला माहीत होतं ! पण आय हॅव क्सेप्टेड द चॅलेंज ! शिवाय असं तिला सोडून देणंही चांगलं नव्हतं ! शिवाय तशी ती ट्रॅक्टिव्ह आहेच ! आणि शिवाय किरकोळ काहीतरी कुठं काय घडत नाही ? आणि शिवाय दुसऱ्या कुणाची तरी खात्री तरी कोण देऊ शकतं ? आणि शिवाय आपल्या स्वत:च्या सावधपणाबद्दल थोडाफार आत्मविश्वास पाहिजेच ! हे तरी का ? तर समाजासाठी. अहो, समाजाशिवाय जगू शकतो का आपण ? आपण आहे याचा अर्थच समाजही आहे ! ही स्वत: तशी भयंकर सूक्ष्म आहे ! आता मलासुध्दा ते चॅलेंज वाटतं म्हणजे बघा तुम्ही ! पण माझ्या सावधानपणामुळं शेवटी ती हिस्टेरिक वगैरे होऊ नये म्हणजे झालं ! आणि झाली तरी काय करणार ! समाजात राह्यचंय आपल्याला ! अपमान नको ! मग त्यासाठी बायको हिस्टेरिक झाली तरी ते पत्करावं लागणारच ! ज्यांचे संसार सुखाचे होतात ते लोक जनरली सावध नसतात असं एक माझं मत आहे. त्यामुळं फार सुखी संसाराची मी अपेक्षाच ठेवलेली नाही !

जगदीप: मी तर समजत होतो की तुम्हाला बॉक्सिंगची आवड आहे !

ठाकूर: ( हसून ) वॉक्सिंगची आवड आहेच । ती तर फार जुनी आवड आहे माझी ! आणि मला बॉक्सिंगची आवड आहे एवढंच तुम्ही समजत असाल हेही ओळखलं होतं मी !

जगदीप: ते कसं काय ?

ठाकूर: माझ्या इतर गोष्टी कळत चालल्यावर तुमच्यावर होणार परिणाम बघून !

जगदीप: तुमचे सगळे अंदाज खरेच असतात असं वाटतं तुम्हाला ?

ठाकूर: अंदाज हे जोपर्यंत अंदाज असतात तोपर्यंत खरे असण्याचा कुठं प्रश्न येतो ? ती एक शक्यता धरून चालायचं असतं.

जगदीप: कमाल आहे !

ठाकूर: यात तशी कमाल वगैरे नसते. मनाची एखादी क्वालिटी वाढवण्याचा हा एक प्रकार असतो. आता आणखी एक उदाहरणार्थ म्हणजे मी आल्यावर काहीतरी चांगल्या गप्पांत खंड पडल्यासारखं वातावरण तयार झालं ! झालं की नाही ? त्यानंतर आणखी काही झालं. काही बोलणं झालं. अशा प्रत्येक वेळी समांतरपणे एक अंदाजांचीसुध्दा साखळी विणली जात असते माझ्या मनात. त्या साखळीला जर सलगपणा यायला लागला किंवा त्याची एक पध्दतशीर गोष्ट तयार व्हायला लागली तर मात्र या सगळया अंदाजांची नीट दखल घ्यावी लागते. काही काही वेळी असं होत नाही. मग ते अंदाजांचे तुकडे वायाही जाऊ शकतात. पण तरीही अंदाज करणं हे एक माझं वैशिष्ट्य आहे.

जगदीप: डेंजरस आहे पण हे ! चुकून जर का गोष्ट तयार झाली तर समोरच्या माणसाची भरलीच मग !

ठाकूर: अहो नम्रपणानंसुध्दा गळा कापणारे लोक मला माहीत आहेत ! ते जास्त डेंजरस असतात !

जगदीप: कठीण आहे. ओळख झाल्याझाल्या एकदम सगळं तिरकसच चालू केलंय तुम्ही !

ठाकूर: ओळख झाल्याझाल्या अशा एकेक गोष्टी स्पष्ट व्हायला लागल्या तर काय करणार ! पण अंदाज कशाला ! माझ्या अंदाजांची टेस्टच घेऊ आपण ! या खोलीत एक टेपिंग मशीन बसवलेलं आहे. पंधरा फुटांच्या परिसरात काहीही आवाज झाले तर ते रेकॉर्ड करतं आणि शांतता असेल तर आपोआप बंद होतं. तुमच्यात झालेलं संभाषण मी तुम्हाला पुन्हा ऐकवू शकतो. ऐकायचंय ?

जगदीप: ( भयंकर नर्व्हस -- ) तुमची इच्छा ! ( नयनतारा येते. ) नयन, तुझं घर म्हणजे एक टेहळणी आणि तपासणी केंद्रच आहे ! आता आपल्यात झालेलं संभाषण रेकॉर्ड केलेलं ऐकवतो म्हणतायत !

नयनतारा: कसलं काय रे ! ऐकवा म्हणावं ! उगीच लोकांना नर्व्हस करायची सवय आहे यांना ! बघितलंय मी !

ठाकूर: पण तुम्ही असे हवालदिल का होताय ? अहो घर आहे हे ! आमचे नातेवाईक येतात, मित्र येतात. त्यांच्यावर असं लक्ष ठेवलं जातंय म्हटलं तर कसं वाटेल त्यांना? घर म्हटल्यावर लोकांनी विश्वासानं यावं आणि मुख्य म्हणजे विश्वासानं जावं हे महत्त्वाचं नाही का ?

जगदीप: ( रिलॅक्स होत, किंचित हसत ) मला मनातनं रागही येत होता आणि तो दाखवणं तर चुकीचं ठरलं असतं. पण लोकांच्या फिरक्या घेण्यात मात्र मानलं पाहिजे तुम्हाला !

नयनतारा: मला तर हे सगळं पोरकटपणाचं वाटतं --

ठाकूर : पण तुमच्या एक लक्षात आलं असेल की तुमच्या आवडत्या क्षेत्रातसुध्दा हम भी कुछ हैं !

जगदीप: कुठलं आवडतं क्षेत्र ?

ठाकूर: जाऊं द्या, सगळं पोरकटासारखं बोलत बसणं मलाही आवडत नाही.

जगदीप: बरं, मी निघू का आता ?

नयनतारा: निघालास ?

ठाकूर : निघलात ?

जगदीप: हो, जातो आता..

नयनतारा: मग परत कधी येणार आता ?

ठाकूर: निदान वर्षातनं एखादेवेळेला तरी येत जा हो ! नाहीतर असं करा नं -- मिसेसना घेऊन या तुमच्या ! (नयनताराला ) कशी आहे आयडिया ?

नयनतारा: छान ! ये नं एकदा तिला घेऊन !

जगदीप: हो, येईन, पण ती जरा आजारी असते हल्ली ! येऊ ?

नयनतारा: काय होतंय ! बोलला नाहीस ते ?

ठाकूर: औषधपाणी वेळच्या वेळी करा म्हणजे झालं ! बऱ्या झाल्यावर या घेऊन !

जगदीप: बरं, चलतो मी !

ठाकूर: या, या !

नयनतारा: अरे, तुझा पत्ता नाही दिलास ?

जगदीप: हं, हो ! हे माझं कार्ड -- ( तिला खिशातून कार्ड काढून देतो. ) येतो मी --

नयनतारा: अच्छा, ये पण - बघीन, मीपण तिची तब्बेत वगैरे बघायला येऊन जाईन - अच्छा !

जगदीप: ( बाहेर --) अच्छा ! ( तो गेल्यावर नयनतारा आत येते. ठाकूर नुसते तिच्याकडे पाहतात. )

ठाकूर: एक गोष्ट तुझ्या लक्षात आली का ?

नयनतारा: ( जरा रागातच -- ) तुमच्या लक्षात येणारं सगळंच मी महत्त्वाचं समजत नाही.

ठाकूर: त्याच्या शर्टावर लिपस्टिकचा डाग होता आणि तो, तो सारखं लपवायचा प्रयत्न करत होता.

नयनतारा: असेल ! पण माझ्याकडं आलेल्यांशी वागायची ही तुमची पध्दत मला आवडलेली नाही.

ठाकूर: इथं येण्याआधी तो कुठंतरी जाऊन आला असावा.

नयनतारा: असेल ! पुन्हा कधी यावंसं वाटेल का कुणाला इथं !

ठाकूर: आणि काय योगायोग पहा -- तुझीही लिपस्टिक विस्कटलेली आहे --

नयनतारा: शक्यच नाही ! काय डोकंबिकं फिरलंय का तुमचं ! संशयाचं भूत झालाय तुम्ही ! स्वत:च्या बायकोचा संशय घेता ! लाज वाटली पाहिजे ! दोन महिनेसुध्दा नाहीत झाले अजून आणि हा संशयीपणा ! शी !

ठाकूर: संतापू नकोस. आपल्याच हार्टवर परिणाम होतो त्याचा ।

नयनतारा: खड्ड्यात गेलं ते माझं हार्ट ! अवघड आहे तुमच्याशी संसार करणं !

ठाकूर: हे बघ. जास्त संतापायचं काही कारण नाही. चांगलं वागणाऱ्यांचे संसार सुखाचे होतात कारण ते सावध नसतात. एका व्यक्तीचं वागणं जरा वेगळया मार्गानं चाललं तरी दुसऱ्या व्यक्तीला ते कळत नाही कारण ती सावध नसते. मी स्वत: मुळात चांगलं वागणारा नाही. त्यामुळं मी सावघ राहणार ! कळलं !

नयनतारा: शी ! काय घाणेरडं तत्त्वज्ञान हे ! फसले मी !

ठाकूर: कुणाला काय बोलतीयस हे जरा लक्षात घेऊन बोल ! माझ्या संयमाची परीक्षा घेऊ नकोस !

नयनतारा: ( आणखी संतापून --) काय कराल ? मारून टाकाल मला ? मारा ! ( ठाकूर पाहात उभे ) माझे मित्र, मैत्रिणी माझ्याकडे येणार ! मी असल्या तुरुंगात राहणार नाही ! आणि ऐकून ठेवा ! मला माझा कधीही संशय घेतलेलं चालणार नाही ! जगदीप आणि मी इथं घरात असलो आणि दरवाजा आतून बंद असला तरी ! कळलं !

ठाकूर: ( काही क्षण पाहून -- ) बरं, बरं, चल ! जास्त चिडाचिड नको ! बास ! बरं, आता पाणी घेऊन ये जरा मला प्यायला --( ती पाहते. संताप थोडा सैल सोडते आणि आत जाते. ठाकूर बसतात. पाय पसरून रिलॅक्सड् बसतात. काही क्षण जातात... स्वत:शी हसतात... ) मला लाईफ शिकवतोय ! च्यूत्या

साला !!... ( अंधार होत जातो...)

**दृश्य दुसरे**

( पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा जगदीपचे घर. जगदीप घरच्या कपड्यांत वर्तमानपत्र चाळत बसलेला -- प्रवेशव्दार दिसेल अशा अँगलने. दरवाजा दघडा. तो मधेच घड्याळाकडे पाहतो. पुन्हा वर्तमानपत्रात. काही क्षणांनी त्याची बायको संध्या -- २५ -- येते. दार लावून घेते. तिचा पोषाख साधा. चष्मा. पण जरा सुंदरच. ती हातातल्या वस्तू ठेवते, बसते. जरा हाशहुश्श करते. जगदीपकडे जणू लक्ष नाही.)

जगदीप: बराच उशीर झाला ?

संध्या: थांब जरा. एकदोन मिनिटं बसते स्वस्थ आणि मग देते उत्तरं सगळी. पण तुला काळजी वाटण्यासारखं काही नाहीय !

जगदीप: मला ? काळजी कसली ?

संध्या: थांब जरा,दोन मिनिटं कळ काढ. मी तरी तुझ्या मनाची किती काळजी घेणार ? एवढा वेळ सहन केलाच आहेस नं माझा उशीर ! आणखी दोन क्षण !

जगदीप: सहन कशाला ? सहज विचारलं !

संध्या: तुझं ’ सहज ’ माहिती आहे मला ! उलट माझं सगळं ’ सहज ’ असतं आणि तुझ सगळं परिश्रमपूर्वक असतं ! पण तुला वाटतं की माझं सगळं प्रयत्नपूर्वक चाललंय सारखं ! माहितीय मला ! ’ सहज ’ म्हणे ! सारखं आपली बायको हरवतीय का तिला कुणी पळवून नेतंय हाच विचार ! तुला सोडून मी कुठं जाणार नाही ! आणि जाणार तरी कुठं ? आहे ते ठीक आहे !

जगदीप: मला तर ही माझ्या, तुझ्यावरच्या प्रेमाची चेष्टा वाटते ! ( संध्या काही क्षण डोळे मिटून बसते. स्वस्थ.)झाली का विश्रांती ? असा आळशीपणा उपयोगी नाही. पटापट विश्रांती घेऊन कामाला लागलं पाहिजे माणूस ! काय !

संध्या: हं, बोल.

जगदीप: नाही, मी म्हणत होतो की तुला ऑफिसातून यायला आज उशीर का झाला ?

संध्या: सेक्स हा विषय सोडून ही शंका आहे का ? की एक अंदाजे तपासणी चाललीय ?

जगदीप: म्हणजे काय ? साधी चौकशीही करू नये ?

संध्या: मला अक्षरश: किळस येते. सारखे सेक्सचे विचार ! तुझेच असं नाही -- जवळजवळ सगळयांचेच !

शी ! म्हणून मी ऑफिसातसुध्दा जरा  फटकूनच राहते -- वागते सगळयांशी !  स्त्री असो, पुरुष असो -- हेच सारखं डोक्यात ! शी !

जगदीप: मी एका ठिकाणी असं वाचलंय की किळस हे आकर्षणाचंच दुसरं रूप असतं. मुळात यात काही फरक नसतो.

संध्या: मला एवढं अवघड काही कळत नाही. आणि मला तसल्या अवघड गोष्टींची आवडही नाही. गरजही नाही त्याची. आणि मुख्य म्हणजे असलं काही ऐकलं की त्रासिक वाटतं मला. किळसवाणंच वाटतं !

जगदीप: मी नुसतं साधं आपलं एक सांगितलं - त्याच्यावर इतकी वाक्यं !

संध्या: साधं नव्हतं ते !

जगदीप: एवढी सगळी अवघड वळणं घेण्यापेक्षा  'उशीर का झाला ' या साध्या प्रश्नाचं साधं सरळ उत्तर देता आलं असतं तुला.

संध्या: आमच्या ऑफिसातला जयकुमार माझ्या बोलण्यातून ऐकून तरी तुला माहिती आहेच-- त्याच्या घरी गेले होते. घरची परिस्थिती चांगली श्रीमंतीची आहे, पण गरीब आहे बिचारा ! तोही ऑफिसात कुणाशी फारसं बोलत नाही ! आपलं काम बरं, आपण बरं -- या पध्दतीनं राहतो बिचारा ! घरी एकटाच असतो ! अजून लग्नबिग्न काही झालेलं दिसत नाही बिचाऱ्याचं !

जगदीप: सगळया सुखात न्हाऊन निघतोय बिचारा !

संध्या: एखाद्या साध्या माणसाची अशी चेष्टा करू नये. ऑफिसात असताना आम्ही मधनंमधनं कॉफी प्यायला एकत्र जातो नं, तर आज तो म्हणाला, माझ्या घरी चला, घरच्या कॉफीची चव घ्या. कॉफी खरंच छान केली होती त्यानं !

जगदीप: पण काय विशेष ?

संध्या: काही नाही, सहज !

जगदीप: आईवडील, भाऊबहीण कुणीच नाही ?

संध्या: उत्तरप्रदेशात कुठंतरी असतात म्हणाला. आणि कशाला आपण दुसऱ्याच्या खाजगी गोष्टीत जास्त खोलात जायचं ?

जगदीप: ते बरोबर आहे. आणि पध्दतशीर नोकरी करतोय म्हणजे खरंही असेल म्हणा ! हा एकटाच इकडं आला म्हणजे !

संध्या: एकटाच राहतोय, पण घर अगदी पॉश आहे. आपलं काहीच नाही त्याच्यापुढे !

जगदीप: गरीब बिचारा !

संध्या: म्हणजे काय ?

जगदीप:	तुला सांगू का, एखादं माणूस दुसऱ्याबद्दल फार सहानुभूती किंवा कीव दाखवायला लागलं ना की ते काहीतरी लपवणं चाललंय असं मला वाटतं !

संध्या:	म्हणूनच एक लपवायचं, एक दाखवायचं असं वागणं नसावंच माणसाचं ! म्हणजे मग असं काहीतरी वाटण्याचा त्रास होत नाही.

जगदीप:	मग सांग नं--एवढा इतका अगदी तुला बिचारा वाटावा असे कोणते खास गुण आहेत त्या जयकुमारमधे ?

संध्या:	अरे, बिचारा असणं हाच एक गुण आहे नं !

जगदीप:	इतका ? !

संध्या:	कध्धी काही मनात नसतं त्याच्या ! साधा आहे अगदी !

जगदीप:	आता मी तुझा नवरा आहे म्हटल्यावर माझ्या मनात असणारच नं !

संध्या:	अंहं -- ते नाही -- एकूणच म्हणतेय मी !

जगदीप:	आता हे मला कळत नाही ! मग हे साधं की अवघड ?

संध्या:	माझं एखादं बोलणं लक्षात ठेवायचं आणि लगेच त्याची परतफेड करायची असं वागू नकोस – साधं वाग ! पोरकटपणा करू नकोस !

जगदीप:	कसंही वागलं तरी चालतं -- प्रेम असणं महत्त्वाचं आहे !

संध्या:	साधेपणातच प्रेम असतं.

जगदीप:	मग आपलं आहे का एकमेकांवर -- प्रेम ?

संध्या:	याबद्दल मला कधीच शंका वाटत नाही. आहेच मुळी !

जगदीप:	आपलं एकमेकांवर प्रेम आहे आणि दुसरीकडं कुठंही अजिबात नाही असं खरं तर व्हायला हवंय ! मलाही बरं वाटेल !

संध्या:	माझं तसंच आहे ! तुझं वेगळं आहे ?

जगदीप:	वेगळं नाही--पण प्रेम असं वाढत वाढत जावं असं मात्र वाटतं ! आहे एवढंच बास असं मात्र वाटत नाही !

संध्या:	करतानाच पूर्ण प्रेम करायचं रे म्हणजे मग वाढायचा वगैरे प्रश्नच येत नाही !

जगदीप:	ते आहे म्हणा ! ( जरा नाराज. )

संध्या:	बोलण्यात हरलास म्हणून नाराज होऊ नकोस ! आपण दोन नाहीच आहोत ! एकच आहोत !

जगदीप:	म्हणूनच मी धन्य आहे !

संध्या:	आपण दोघंही !

जगदीप:	तेच !

संध्या: ते सगळं ठीक आहे, पण खरं -- तुझ्या मनातलं सांगू का ? मी कॉफी प्यायला जयकुमारच्या घरी का गेले ? मी किती वेळ तिथं होते ? आम्ही काय बोलत होतो ? घरात कुणीच नाही हे मला कधी कळलं ? त्यानं घरी बोलावल्यावर मी लगेच तयार कशी झाले ? तो दिसायला कसा आहे ? त्याचा आवाज, बोलणं कसं आहे ? दुसऱ्या कुणाशी तो फारसं बोलत नाही तर माझ्याशी कसं काय बोलतो ?-- या आणि अशा इतर प्रश्नांत तुला खरं तर इंटरेस्ट आहे ! सारखे सेक्सचे विचार मेले ! किळस येते मला !

जगदीप: असलं काहीच माझ्या मनात नाही असं म्हणायला भाग पाडतेयस तू मला -- एकदा जिंकत चाललं की जिंकत जातं माणूस ! याच्यावर आता प्रामाणिकपणा हा एकच उपाय दिसतोय मला ! ( क्षणभरानं -- ) खरंच हे प्रश्न आहेतच माझ्या डोक्यात !

संध्या: हे तुझं प्रेम !

जगदीप: हो, हेच माझं प्रेम ! पण सांग आता उत्तरं -- त्या प्रश्नांची !

संध्या: सारखे सेक्सचे विचार मेले ! शी ! ( उठून आत जाते. )

जगदीप: ( स्वत:शी --) शी, शी म्हणायची ही एक ट्रिकच आहे साली ! ( वैतागून बसतो. क्षणभरानं दारावरची बेल वाजते. तो उठणार एवढ्यात संध्या आतून येते आणि दाराकडे जाऊन दार उघडते. दारात ठाकूर आणि नयनतारा. ती अर्थातच त्यांना ओळखत नाही. ती अजूनही त्या वादाच्याच मूडमध्ये आहे.)

संध्या: कोण ?

ठाकूर: तुमच्याकडेच आलोय आम्ही.( जगदीप पाहतो. पुढे येतो.)

जगदीप: अरे वा, या,या ! बसा ! ( संध्याशी ओळख करून देत -- ) ही माझी पत्नी -- संध्या -- आणि संध्या, हे श्री.ठाकूर आणि या मिसेस नयनतारा ठाकूर -- या आणि मी कॉलेजात एकत्र होतो !

संध्या: हं ! आलेच ! ( आत जाते. )

नयनतारा: इकडून निघालोच होतो, तर यांना आठवलं की तुम्ही इथे राहता -- भेटून येऊ म्हणाले !

जगदीप: आलोच ! ( आत जाऊ लागतो - )

ठाकूर: मिसेस नोकरी करतात वाटतं ! नुकत्याच आलेल्या दिसतायत ! एवढा उशीर होतो ?

जगदीप: नाही, आजच झालाय उशीर ! आलोच ! ( जातो. )

ठाकूर: ( बसत -- ) यांच्यात काहीतरी वाद झालेला असून तो बहुतेक आज झालेल्या उशीरामुळेच झालेला असावा ।

नयनतारा: आपल्याला काय करायचेत हे अंदाज ?

ठाकूर: आपण तर सहज म्हणून आलोय ! सुरुवातच विचित्र झाली ! हा एक साधा रूटीन वाद असेल ? ( जगदीप आणि संध्या बाहेर येतात, ते काही बोलण्यापूर्वीच--) कशी काय आता यांची तब्बेत ? तुम्ही आमच्याकडे आलात तेव्हा या आजारी होत्या.

संध्या: मला काय झालंय ? ( मूड अजून तोच.) चांगली ठणठणीत आहे मी ! कधी आजारी होते मी ? (जगदीपला-- ) काय रे ?

जगदीप: असं म्हणालो होतो मी ? तरी चारसहा महिने झाले असतील आपल्या भेटीला !

नयनतारा: हो, झाले असतील --

जगदीप: काही आठवत नाही -- पण -- ( नयनताराकडे पाहून फक्त ठाकूरना --) दिवस होते ना ?

ठाकूर: कुठलं काय, बोलून गेलो झालं त्यावेळी ! चारसहा महिने झालेच की त्याला !

जगदीप: हो, हो -- एकच ते ! सगळं ओके असलं की सावधपणा जरा जास्त लागतो !

संध्या : फालतूगिरी काहीतरी ! ( ठाकूरना --) तुम्ही चहा घेणार की कॉफी ?

नयनतारा: मी कॉफी घेते.

ठाकूर: मलाही कॉफी चालेल --

जगदीप: छान ! चहापेक्षा कॉफी कधीही चांगली !

ठाकूर: ( जगदीपला --) आलो की नाही आम्ही न बोलावता ?

जगदीप: मी कार्ड दिलं होतं !

नयनतारा: गंमत रे !

ठाकूर: आम्ही उद्या चाललोय पिकनिकला माथेरानला -- येणार का ?

जगदीप: नाही, सध्या जरा कामाचे प्रॉब्लेम्स आहेत --

ठाकूर: मग संध्या वहिनी ?

संध्या: मलाही नाही जमणार -- ( आत जाते. )

ठाकूर: ठीक आहे -- फिर कभी !... आमच्या नयनला जुन्या गोष्टींची भारी आवड ! तुम्ही गेल्यावरसुध्दा कॉलेजातल्या जुन्या मित्रमैत्रिणी वगैरे याच मूडमधे होती ती ! मीही ऐकत होतो. ( जगदीप साशंकपणे पाहतो.)

नयनतारा: गेले ते दिवस ! ( जगदीपला -- ) नाही का रे !

जगदीप: हो नं !

नयनतारा: आज रजा घ्यायला लावलीय यांना !

जगदीप: अरे वा !

नयनतारा: ( जगदीपला --) तुझा कसा काय चाललाय व्यवसाय ? आणि इतर अभ्यास ?

जगदीप: आहे आपलं, ठीकाय !

ठाकूर: अभ्यास कसला ?

जगदीप: जाहिरातींसाठी हो -- उगीचच नॉलेज ठेवावं लागतं -- भारतात एनर्जी ड्रिंक्स किती आहेत, त्यातली कोकोबेस, नॉनकोकोबेस कोणती --आयुर्वेदिक टूथपेस्टमधे ही का चालली नाही आणि ती का प्रचंड चालली, वगैरे --

ठाकूर: असेल, असेल --

जगदीप: सारखं कल्पनाशक्तीला खाद्य तर जमवत राहिलंच पाहिजे ! कुठलीही कपॅसिटी न वापरता पडून राहू नये !

ठाकूर: आम्हाला मात्र कल्पनाशक्तीच्या क्षेत्रातून लौकरात लौकर वास्तवात येणं आवडतं ।

जगदीप: मी कुणाला आव्हान देत नाहीय ! प्रत्येकाच्या वेगवेगळया स्टाईल्स असतात ! स्वधर्मे निधनम् श्रेय: !

नयनतारा: ए च् संस्कृतपण येतं तुला ? ( हसते आणि आत जाते.)

ठाकूर: मला वाटतं, आम्ही लौकरात लौकर जावं इथून --

जगदीप: का ? बसा हो !

ठाकूर: आपला दुर्गुण माहीत आहे तुम्हाला ! अंदाजांची साखळी ! उगीच नकोच ते ! तुम्हीसुध्दा फारसे मजेत दिसत नाही आहात !

जगदीप: नाही, तसं काही नाही -- ( नयनतारा आणि संध्या येतात. संध्याच्या हातात कॉफीच्या चार कपबशा असलेला ट्रे. नयनतारा बसते. संध्या प्रत्येकाला कॉफी देते. )

ठाकूर: ( संध्याला -- ) वहिनी, तुमचा हात पाहून सांगतो, तुम्ही रांगोळया घालाल तर मोठ्या घालाल -- बारीक नक्षीकाम तुम्हाला आवडणार नाही -- मोठी कामंच आवडतात तुम्हाला --

संध्या: ( मूड बदलत --) अय्या, खरंच -- भविष्य सांगता तुम्ही ? माझं सांगा नं ! दाखवू ?

ठाकूर: नाही -- हात सकाळीच पाहावा, रात्रीच्या दिव्याच्या उजेडात पाहू नये -- हा नियम फार तर मोडेन मी तुमच्यासाठी -- पण दुसरा नियम आहे -- हात पाहताना तिथं तिसरी व्यक्ती नसावी -- हा नियम मात्र मी मोडत नाही.

संध्या: का ?

ठाकूर आता ' का '? अहो, एकदा, एकानं, असा चारचौघांत हात पुढे केला आणि सांगा म्हणाला, तर लगेचच दिसणारी गोष्ट म्हणजे त्याच्या शुक्र उंचवट्यावरचा काळा ठिपका -- आता त्याला मी सांगावं का सगळया लोकांत की बाबा, गुप्तरोगापासून जप म्हणून ! ?

संध्या: माझं तसलं काही असणंच शक्य नाही !

ठाकूर: तेच असं नाही हो, प्रत्येकाचं थोडंफार तरी फक्त स्वत:लाच माहीत असलेलं असं जगणं असतंच नं ! इट इज नॉर्मल !

संध्या: मला नाही असलं काही कळत ! आणि सेक्स या विषयाकडं तुमचा रोख असेल तर मला किळस आहे त्याची !

ठाकूर: छे, छे, तसलं काहीच म्हणायचं नव्हतं मला !

संध्या: पण छान ओळख झाली आपली आज ! खरं तर मला फारसं बोलता येत नाही कुणाशी पण तुम्ही दोघं छान -- प्रसन्न, निरागस वाटता !

जगदीप: निरागस ? लहान मुलं आहेत का ती ? हल्ली भाषेचा सेन्सच राहिलेला नाही कुठे ! बरोबर शब्द वापरणं, योग्य ठिकाणच्या आघातांनी बोलणं हे खलासच झालंय !

ठाकूर: त्यांना ' चांगलं ' म्हणायचंय एवढं लक्षात घ्यायचं हो !

जगदीप: आज पहिल्यांदाच वापरला तिनं तो शब्द !' निरागस ' ! ( ठाकूर खिसे चाचपतात. सिगरेट्स् संपल्याचं लक्षात येतं. )

ठाकूर: मी जरा सिगरेट्स् घेऊन येतो हं -- आलोच दोन मिनिटांत --

नयनतारा: नाही ओढली थोडा वेळ तर काय होईल ?

ठाकूर: आलोच ! ( जातात. संध्या क्षणभरानं कपबशा ट्रेमधे घेऊन आत जात -- )

संध्या: प्रसन्न आणि निरागस -- हे बरोबरच आहे ! आलेच हं -- ( आत जाते.)

जगदीप: मुद्दाम कसं म्हणाली पाहिलंस ना !

नयनतारा: तेवढं तर होणारच रे ! पण तू असा दबून का वागतोयस ?

जगदीप: तुम्ही यायच्या आधी आमचा जरा दुसरा काही विषय चालला होता. त्याचा परिणाम आहे हा -- एका साईडला डोक्यात तेच चालू आहे -- अर्थात् ठाकूर बरोबर नसते आणि नुसत्या आपल्यातच गप्पा मारायच्या असत्या तर मी ते विसरू शकलो असतो --

नयनतारा: त्यांची काहीतरी अंदाजांची साखळी चालू झालीय म्हणत होते -- त्यातनं काही निघालं बिघालं तरी मनावर घेऊ नकोस -- संध्या मला तरी छान वाटतेय -- पण तुला माझ्या शिवाय थारा नाही असं होऊ देऊ नकोस --

जगदीप: बरं होईल असं एकदाचं काही सापडलं तर ! ( सावरत --) म्हणजे तसं नव्हे -- पण तरी नवरा बॉक्सर आहे तुझा -- ते मुख्य कसं विसरणार ?

नयनतारा: अरे पण माझी काही तक्रार असल्याशिवाय बॉक्सिंगचा उपयोग करतील का ते ?

जगदीप: पण समजा काही कारणानं चिडून दिला एक त्यांनी मला असा गुद्दा ठेवून आणि पडले माझे दात तर पुढं काय करणार ? तुझ्या नवऱ्याविरुध्द मी तक्रार करायची ? कुठं ? त्याच्याच डिपार्टमेंटकडं ? आणि तुझ्याच नवऱ्याविरुध्द मी भांडतोय म्हटल्यावर तुला त्याच्या विरुध्द बोलता येईल ? नाईलाजानं का होईना पण तू राहणार सलामत, पण माझे दात ?

नयनतारा: पण असं चिडायला कारणच द्यायचं नाही ना !

जगदीप: ते आहे, पण असे सगळे विचार असतातच !

नयनतारा: म्हणजे असलं काही तरी वागायचं तुझ्या मनात होतं ? ! बापरे ! मलाही काळजीच घ्यायला हवी म्हणजे ! ( संध्या येते.) मला वाटलं बराच काळ तुम्ही इथं राहताय !

जगदीप: वर्ष झालं फक्त !

संध्या: यानं कार्ड दिलं होतं तर तुम्ही फोनबीन नाही केलात कधी ?

नयनतारा: मला भीती होतीच तुम्ही असं विचाराल याची ! आरोप बिनशर्त मान्य !

संध्या: आपल्या मनात काही नसलं म्हणजे झालं हो ! भीती कसली ! ( ठाकूर येतात. )

ठाकूर: ( संध्याला-- ) खरं सांगतो, तुम्ही समजताय इतके आम्ही चांगले आहोत का ही मला तरी शंका आहे आणि ती तुम्हाला न सांगणं म्हणजे तुमची फसवणूक होईल !

संध्या: बघितलं की कळतं !

जगदीप: स्पष्टच म्हणजे सगळयांच्या डोक्यांत सतत सेक्सचेच विचार असतात असं तिचं म्हणणं असून त्याची तिला किळस आहे -- तुम्ही तसे नाही असं म्हणायचंय तिला !

ठाकूर: ( संध्याला -- ) पण तुम्हाला जे काय वाटलं त्याला अजिबात बाध न आणता आणि नम्रपणानं आणि शिवाय खरेपणानं मी असं म्हणेन की तुम्ही सुंदर आहात !

संध्या: सुंदर म्हणा हो. आणि आहेच मी तशी. मनात काही नसलं म्हणजे झालं !

ठाकूर: तसं असतं तर माझ्या बायकोसमोर कसं बोलू शकलो असतो मी ?

नयनतारा: खरंच छान दिसता तुम्ही !

ठाकूर: आम्ही कसले निरागस, तुम्ही निरागस !

जगदीप: मी जेव्हा नयनला म्हणजे नयनताराला सुंदर म्हणतो तेव्हा माझ्याही मनात काही नसतं !

ठाकूर: म्हणालात काय तुम्ही असं कधी तिला ? आणि नयन म्हणता म्हणता नयनतारा असं सावरून घेतलंत हे ठीकच झालं !

जगदीप: समजा म्हणालो तर असं म्हणतोय मी !

नयनतारा: म्हण रे ! त्यानं काही बिघडत नाही !

संध्या: आमच्या ऑफिसात एक जयकुमार नावाचा माणूस आहे.( ठाकूरना --) तुमच्या सारखाच छान आहे अगदी ! बाकीच्यांशी मी बोलतही नाही ! सारखे सेक्सचे विचार मेले डोक्यात ! शी ! साधं, सरळ वागणं नाहीच !

जगदीप: मला नं कधीकधी असं वाटतं की खरंखोटं समजायची वाट न पाहता, आलंय ना मनात म्हटल्यावर ए ऽ क खाडकन देतात ठेवून ना काही लोक, त्यांचं बरोबरच असतं एका दृष्टीनं !

नयनतारा: अरे, अरे, ( ठाकूरांकडे पाहून पण बेफिकीरीनं जणू मुद्दाम जगदीपजवळ जाऊन बसत--) असं म्हणून नये ! असं बोलल्यानं तुझ्या सुंदरपणाही कमी नाही का होत ? आणि तू तर वकील आहेस ! खऱ्याचं महत्त्व माजवणं कित्ती महत्त्वाचं असतं हे काय तुला सांगायला हवंय ?

जगदीप: खरं शोधणाऱ्याला जिथं कधीच पोचता येत नाही असं खरं !

नयनतारा: म्हणूनच तर खरं तर ' खरं ' महत्त्वाचं असतं ! आणि कुणीही अंदाजानं वागणं वाईट असंच आपलं मत असायला नको का ?

जगदीप: तेही बरोबर आहे म्हणा !

ठाकूर: पटलं तर मग !

संध्या:: ' खरं ' त्याला जरा उशीरा पटतं ! आता हेच पहा नं -- ( नजरेत राग -- ) ही दोघं इथं बसली आहेत -- (ठाकूरना -- ) तुम्ही तिथं उभे आहात -- तिथंच थांबा -- ( जगदीप - नयनतारा प्रेक्षकसन्मुख आणि ठाकूर पाठमोरे. संध्या जणू मुद्दाम उठते आणि येऊन ठाकूरांना आलिंगन दिल्याच्या पोझमधे उभी राहते -- हात ठाकूरांच्या पाठीवर घेते.) अशी जरी मी येऊन उभी राहिले तरी काही नाही -- मन स्वच्छ पाहिजे --( हातांच्या बोटांनी ठाकूरांच्या पाठीवर उत्तेजक हालचाली करते. त्या अर्थात नयनतारा, जगदीप यांना दिसत नाहीत. ठाकूरांना -- ) आहे ना हे मनात काही नसणं ?

ठाकूर: ( बाजूला होत --) प्रश्नच नाही -- ( संध्याचं वागणं ही आपल्या वागण्याला प्रतिक्रिया आहे हे ओळखून नयनतारा उठून बाजूला जाते. )

संध्या: आणि मघाशी तुम्ही म्हणालात तसं -- मनात असतं तर सगळयांच्या समोर वागूच शकले नसते मी अशी --

ठाकूर: वन्हि तो चेतवावा रे -- चेतवीताचि चेततो -- हे कुणाचं आहे ?

जगदीप: हे असलं सगळं रामदासांचं असतं -- ब्रम्हचारी होते ते -- प्रयत्नपूर्वक वागल्यावर काहीही कसं साध्य होऊ शकतं ते सांगायचे ते --

ठाकूर: पण यांनी ( संध्याकडे निर्देश. ) खोटं पाडलं ते ! मनातच नसल्यावर -- खरंच --लव्हली ! मनातच काही ठेवायचं नाही ही आयडिया खरोखर अव्दितीय आहे --

जगदीप: युनिक म्हणा नं मग !

ठाकूर: तेच ! खरोखर !

जगदीप: एखाद्या निरुपयोगी गोष्टीनं एवढं कुणी उल्हसित होत नाही -- बहुतेक उपयोगी असावी ती आयडिया -- तरी मी उल्हसित म्हटलंय -- उत्तेजित म्हटलेलं नाही --

ठाकूर: भाषेवर खरोखर तुमचं प्रभुत्वच आहे -- शब्दांचा वापर करेक्ट अगदी --

जगदीप: शब्द बापुडे पोकळ वारा -- हे तुकारामांचं आहे -- ते ब्रम्हचारी नव्हते -- संसारी होते --

ठाकूर: तुम्हाला खरोखर हे सगळं माहीत आहे की कुणाच्याही नावावर काहीही खपवताय तुम्ही ? माझा काही एवढा अभ्यास नाही --

जगदीप: अहो तुम्ही तर कुलगुरू ! तुमचा अभ्यास नाही ?

ठाकूर: नाही, खरंच ! मनात नसलं तरी मलाच उलट दबल्यासारखं झालं -- हिच्यासमोर ! (नयनताराकडे निर्देश.)

नयनतारा: असं, चारचौघांत, मिनिटभरात काही होऊही शकत नाही --

जगदीप: आणि मला काय वाटलं ते मी बोलूच शकत नाही ! मन अस्वच्छ आहे माझं !

संध्या: ( ठाकूरना --) आलं ना लक्षात -- हे असं आहे सगळं -- निष्कारण छळ नुसता !

नयनतारा: ( संध्याला --) जाऊं द्या -- तुमचं घर पाहू नं जरा --

संध्या: हो, चला नं --( ठाकूरना --) येताय ?

ठाकूर: नाही, या तुम्ही. ( त्या दोघी जातात. जगदीपला --) त्यांच्या मनात काही नाही हे त्यांनी कृतीनं दाखवलं तसं तुमच्या मनात राग आहे हे तुम्ही कृतीनं का दाखवलं नाही ?

जगदीप: म्हणजे काय उठून मुसकाडीत द्यायची एक ठेवून का काय ! आणि कशासाठी ? तुम्ही सगळे चांगले हे सिध्द झालेलं असताना ! उगीचच तमाशा करायचा ?

ठाकूर: ते आहे म्हणा ! पण सगळीकडेच अशी विचारपूर्वक वागण्याची पध्दत उपयोगी पडत नाही असं मला वाटतं -- ठीक आहे -- पण तुमचा प्रॉब्लेम आलाय माझ्या लक्षात --

जगदीप: कसला प्रॉब्लेम ?

ठाकूर: हेच -- सेक्सला ' शी घाण ' म्हणणं !

जगदीप: छे, छे, त्यामुळं आमच्यात असा काहीच प्रॉब्लेम नाहीय -- आम्हाला तशी मजा येते -- त्यात तसा प्रॉब्लेम नाही -- सेक्सबद्दलची तशी पूर्ण किळस नाहीय ती ! आणि हे मला माहीत असल्यामुळंच मला ती किळस खोटी वाटते ! आमचंही सगळं बिघडलेलं असतं तर मग तिला खरंच किळस वाटते याच्यावर माझा विश्वास बसला असता !

ठाकूर: म्हणजे तुमच्यात सगळं चांगलं आहे हाच खरा प्रॉब्लेम आहे !

जगदीप: ती किळस मला खोटी वाटणं हा ! ( त्या दोघी एकीकडून येतात आणि दुसरीकडे जातात.)

ठाकूर: माझ्या एकूण लक्षात आलेलं एक सांगतो -- जगणं म्हणजे मनाचं खरचटत व्यग्र असणं -- मग विषय कुठलाही असो -- अमुक घडावं, अमुक टिकावं, तमुक संपावं आणि ढमूक घडू नये -- या चार प्रकारांत हे खरचटणं सतत चालू असतं -- आणि पाचवं म्हणजे हे खरचटणं थांबेल की काय ही या चारही प्रकारांत कॉमन असणारी भीती ! बस् ! जगण्याचा सारांश हा एवढाच ! ( त्या दोघी येतात. ठाकूर

डबल सोफ्यावर बसलेले -- त्यांच्या शेजारी संध्या बसते. जगदीप सिंगल सोफ्यावर. नयनतारा दुसऱ्या सिंगल
सोफ्यावर बसते.)

नयनतारा: मस्त आहे घर तुमचं !

संध्या: अहो, हे तर काहीच नाही -- मी आज जयकुमारकडे गेले होते ना, तर तो तर एकटाच राहात असूनसुध्दा कसलं ' पॉश ' ठेवलंय त्यानं घर !

जगदीप: मला असले लोक बनावट वाटतात !

संध्या: दृष्टी तशी सृष्टी !

ठाकूर: ( संध्याला -- ) तुमच्या तुमच्यातले टोमणे जाऊं देत पण मोजकंच आणि समर्पक बोलता तुम्ही !

संध्या: ( नयनताराला --) तुम्ही एका कॉलेजात होता तर तेव्हा कसा होता हा ? ( जगदीपकडे निर्देश. )

नयनतारा: चांगलाच होता !

संध्या: मित्रमैत्रिणी भरपूर असतील !

नयनतारा: मित्र कमी, मैत्रिणी जास्त ! मीही होते त्यातली एक ! मजा यायची ! चावट ज्योक्स सांगायचा तो आम्हाला !

संध्या: शी ! आणि सांगताय हे तुम्ही ! !

नयनतारा अहो काळ असतो तो !

संध्या: काळबीळ काही नाही -- काय बदल झालाय याच्यात आता तरी ?

जगदीप: ( नयनताराला --) ए, काहीतरीच काय सांगतेस ! ठाकूरना काय वाटेल !

ठाकूर: माझ्या अंदाजांत फारशी नवीन भर पडतेय असं नका समजू तुम्ही !

नयनतारा: ते तसले बुरसट विचारांचे नाहीत ! फ्री आहेत ! तसले असते तर ऊठसूठ प्रत्येकाला ठोसे लगावत बसले असते ते ! पण लोक त्याला वेडेपणा म्हणतील हे कळतं त्यांना !

ठाकूर: माझ्याकडे बॉक्सिंगची कला असून बऱ्याच वेळा ती व्यक्त न होता पडून राहते ! मला भीती एवढीच आहे की एकदम ती भरमसाट व्यक्त होऊ नये म्हणजे झालं !

संध्या: ( नयनताराला ) अजूनही तुम्हाला ते खटकत नाही -- तुम्ही सहज सांगताय !

नयनतारा: खटकायचं काय त्यात ! लांबून नुसते ज्योक्स तर सांगत होता तो !

संध्या: शी !

जगदीप: हेल्दी फ्रेंडशिप म्हणतात त्याला ! ( नयनताराला -- ) जाऊं दे -- दुसरं काही बोलू --

ठाकूर: म्हणजे दोनापैकी एक निरागस कमी झाला -- आपलं, झाली !

संध्या: ( ठाकूरांच्या मांडीवर हात ठेवून --) तसं नाही हो -- चेष्टा नका करू -- माझा स्वभाव जरा वेगळा आहे इतकंच -- ( हात तसाच -- सगळे निरनिराळया प्रकारे अस्वस्थ.)

नयनतारा: आल्यावर करता स्वैपाक वगैरे ?

संध्या: हो ना ! आमचं खरं जेवण रात्रीचंच ! रूटीन झालं पण आता ते !

नयनतारा: जगदीप आणतो का भाजी वगैरे ?

संध्या: हा कसला आणतोय हो भाजी --( असं म्हणताना हात उचललेला -- ) भाजी, दूध, किराणामाल --हे सगळं मीच बघायचं ! ( पुन्हा हात तिथेच --)

नयनतारा: अशी नका सवय लावू त्याला -- हळूहळू स्त्रीमुक्ती आणा जरा घरात -- निदान आठपंधरा दिवसातनं घराची स्वच्छता तरी करायला लावा -- पंखे कोण पुसतं ?

संध्या: ते मात्र तो करतो --( रडवेली होत --) पण माझी काही तक्रार नाही...काही तक्रार नाही माझी...( रडू लागते...) खूप चांगला आहे तो ...

जगदीप: ए, काय झालं ?

नयनतारा: ( उठत --) काय झालं हो ? ( संध्या हमसून रडत एकदम ठाकूरांच्या गळयात पडते ...)

संध्या: मी जयकुमारकडे गेले होते पण माझी कसलीही चूक झालेली नाही ... तसं काहीच नाही ...आणि तरीही जगदीप...उगीचच...

ठाकूर: ( जगदीपला --) मग काय हो ? कशाला... उगीचच...?

नयनतारा: ( जरा खोचकपणे --) तेच नं -- कशाला !

ठाकूर: ठीक आहे ...शांत व्हा तुम्ही ...( जगदीप दोन्ही हातांत डोकं धरून, मान खाली घालून बसलेला. नयनतारा जाऊन जगदीपच्या पाठीवर हात ठेवून उभी......ठाकूर आता -- संध्याच्या डोक्यावर हात ठेवून पाहताहेत जगदीप -- नयनताराकडे ... तसंच--संध्याला --) शांत व्हा तुम्ही ...हं ...आलोच हं मी ...( तिला बाजूला करून उभे राहतात...) आता माझ्या अंदाजांच्या साखळीची एक पूर्ण गोष्ट होतेय...नक्कीच...( नयनतारा अजूनही तशीच उभी...पाहतेय...जगदीपही पाहू लागलेला...) आता माझ्या कलेचा उपयोग करायची वेळ आलीय जगदीप...( ते हाताचा ठोसा करून जगदीपच्या दिशेने येतायत हे पाहून नयनतारा मधे येते...)

नयनतारा: काय आहे ? काय चाललंय हे ? कशासाठी ?

ठाकूर: नुसतं ( गुद्दा दाखवत --) असं टच करतो तिथं --तोंडावर -- किमान दोन दात तरी पडतील ---

नयनतारा: का ? कशासाठी ? तुमच्या एखाद्या तात्पुरत्या संशयासाठी कायमचं नुकसान करायचं नाही कुणाचं -- ( जगदीप जरा घाबरलेला ...)

ठाकूर: दोन दात तरी पाडावेच लागतील आता --

नयनतारा: ( मधे येत --) नाही, आधी माझे दात पाडा, मग त्याचे --( संध्या सावरते, डोळे पुसते, पाहते. मग केस मागे बांधण्यासाठी दोन्ही हात उंच मागे नेते ...)

संध्या: ( तसंच ---) काय झालं ठाकूर ? -- जाऊं द्या -- मी करतेय ना विनंती --

( ठाकूर तिच्याकडे पाहतात. त्यांचा गुद्दा हळूहळू सैल पडत जातो...क्षणभरानं पडदा पडत जातो...)

--- ००० ---

सूचना : सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. प्रयोगापूर्वी लेखी अनुमती घेणे आवश्यक आहे.

पत्ता:-: चं.प्र.देशपांडे,

३, स्नेहदीप अपा. वीर सावरकर मार्ग,

सहकारनगर नं.२, पर्वती,

पुणे - ४११ ००९.

दूरध्वनी: २४२२ ७८४७ / २४२२७८४८ / ९३७१००५७७३.